# आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेली ग्रंथमाला



## वर्गविग्रह

# या अंकात


1. भारतीय चर्चापद्धती : 4 – चरकसंहिता: वाद्‌विद्येचे प्रात्यक्षिक — श्रीनिवास हेमाडे — 3
2. चलनबंदी : एक अर्थाभ्यासीय दृष्टिकोन — आनंद मोरे — 11
3. सावरकर हे नव-भारताचे राष्ट्रपिता, गांधी हे सावत्रपिता — आशिष नंदी (अनु. प्रज्वला तट्टे ) — 18
4. काश्मीरचे वर्तमान : 1 — सुरेश खैरनार — 26
5. लॉन्सचा छोटासा इतिहास — युवल नोह हरारी (अनु. धनंजय मुळी ) — 32
6. प्रतिसाद : ध्यान-मीमांसा — डॉ. उल्हास जाजू — 40
7. कविता : विळा लावणारा जन्म — वैभव देशमुख — 48


**मुखपृष्ठावरील चित्र : आंतरजालावरून**


संस्थापक संपादक
**दि. य. देशपांडे**

संपादक
**रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ**

प्रकाशन – 3 डिसेंबर 2016
प्रकाशकः भरत मोहनी, श्रीमोहिनीराज, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर 440010.
मुद्रकः नितीन तापस, श्याम ब्रदर्स, एस.टी.स्टँड रोड, नागपूर-18.
प्रत – रु.30 फक्त



**संपर्कः**
रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ ravindrarp@gmail.com
editor.sudharak@gmail.com
भरत मोहनी bharat_i@yahoo.com (9822736808



ही ग्रंथमाला संक्षिप्त स्वरूपात www.aajachasudharak.in वर प्रकाशित होते, संपूर्ण ग्रंथमाला मुद्रित पुस्तकाच्या स्वरूपात हवी असल्यास वर्षभरासाठी रु.300 व्यक्तीसाठी आणि रु.350 संस्थेसाठी पाठवून सभासद व्हावे. सभासद शुल्क मनीआर्डर अथवा पेयेबल ॲट पार चेक ने आजचा सुधारक, 201, श्रीमोहिनीराज, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर-440010. येथे पाठवावे.

# भारतीय चर्चापद्धती: 4 -
# चरकसंहिता : वादविद्येचे प्रात्यक्षिक

***श्रीनिवास हेमाडे***

*चर्चापद्धती, चरकसंहिता, वादविद्या*

---------------------------------------------------------------------------

'भारतीय चर्चापद्धती'चा इतिहास सांगणाऱ्या ह्या लेखमालेच्या ह्यापूर्वीच्या भागात आपण आन्वीक्षिकीचा परिचय करून घेतला. आयुर्वेदाने ह्या पद्धतीचे उपयोजन तज्ज्ञ मंडळींमध्ये मानवी आरोग्यविषयक चर्चा घडविताना अतिशय प्रभावी पद्धतीने केले. चरकसंहितेच्या आधाराने लिहिलेल्या ह्या लेखातील विद्वज्जनांच्या परिषदांबद्दलची अनेक निरीक्षणे आजही प्रासंगिक ठरू शकतील.

---------------------------------------------------------------------------

आन्वीक्षिकीचा एक मुख्य विषय बनलेली हेतुविद्या (तार्किक कारणांचा सिद्धान्त) ही तर्कविद्या (वादकला) आणि वादविद्या(चर्चाकला) या नावांनीही ओळखली जात असे. विद्वान लोकांच्या परिषदांमधून तिचा विकास संथगतीने अनेक शतके होत गेला. या परिषदांना संसद, समिती, सभा, परिषद अथवा पार्षद असे म्हटले जात असे. ही परिषद चार, दहा किंवा एकवीस ब्राह्मणविद्वानांची असे.

**तन्त्रयुक्ति**

या परिषदांमध्ये ज्या संज्ञा वापरल्या गेल्या, त्यांच्या रचनेतून 'तन्त्रयुक्ति' नावाचे तांत्रिक शब्दांनी बनलेले शास्त्र निर्माण झाले. 'तन्त्रयुक्ति'चा अर्थ 'शास्त्रीय विवेचनाच्या पद्धती' असा होतो. पंडित र. पं. कंगले यांच्या मते 'येथे तन्त्र म्हणजे शास्त्र'. या शास्त्राचा 'विचार' हा विषय असल्याने 'तन्त्रयुक्ति' हे विचार करण्याचे शास्त्र आहे.

डॉ. सतीशचंद्र विद्याभूषण यांच्या मते सुश्रुतसंहितेनुसार परिषदांमधील ही 'तन्त्रयुक्ति' एक समग्र चर्चापद्धती म्हणून बहुधा इ.स.पू. सहाव्या शतकात आकाराला आली असावी. आन्वीक्षिकीचा प्रस्थापक मेधातिथी गौतम (इ.स.पू. ५५०) याने आन्वीक्षिकीचे जे मुख्य सिद्धान्त सुव्यवस्थितपणे रचले, ते चरकसंहितेत आणि न्यायसूत्रांत आढळतात.

चरकसंहितेचे मूळ नाव आयुर्वेदसंहिता. तिचा मूळ प्रणेतालेखक पुनर्वसू आत्रेय (इ.स.पू. ५५०) हा आन्वीक्षिकीचा एक गुरु. चरकाने (इ.स.पू.७८) मूळ संहितेचे काटेकोर संपादन करून आन्विक्षिकीचे सिद्धान्त आयुर्वेदात समाविष्ट केले, तीच चरकसंहिता म्हणून प्रसिद्ध झाली.

ज्ञानशास्त्र या अर्थाने पाहता ज्ञान म्हणजे काय ? सत्य व यथार्थ ज्ञानाची लक्षणे कोणती ? ज्ञानाचे मार्ग कोणते ? ज्ञेयवस्तूचे स्वरूप काय ? अनृत/भ्रम म्हणजे काय ? ज्ञानाचे वितरण कसे होते ? ज्ञानाचा अधिकारी होण्याची पात्रता काय, इत्यादींची चर्चा चरकसंहितेत आढळते.

चरकसंहिता ही गुरुशिष्यांतील शास्त्रीय विषयावर संभाषाविधिच्या स्वरूपात केलेली चर्चा आहे. यात सुमारे पासष्ठ ऋषींचा उल्लेख असून विविध परिषदांची माहिती दिली आहे.

**तद्विद्यसंभाषा**

तद्विद्यसंभाषा ही ज्ञानाची आणि चर्चेची 'तन्त्रयुक्ति'पूर्ण पद्धती होती. तेथील निर्णय हे सिद्धान्त म्हणून मान्य केले जात असत. (*सिद्धान्तोनामयः परीक्षकैः बहुविधं परीक्ष्य हेतुभिश्च साधयित्वा स्थाप्यते निर्णयः* ) मिळेल तेथून ज्ञान ग्रहण करावे, त्याची परीक्षा करावी आणि मगच त्याचा स्वीकार करावा (*विविधानि शास्त्राणि ....च* ), प्राणी, वनस्पती, शैवाल इत्यादी सारे काही सजीव असून औषध म्हणून मानवाला ते सारे उपयुक्त आहेत, ही आंतरविद्याशाखीय दृष्टी चरकसंहितेत आढळते.

वादविधीची चर्चा चरकसंहितेच्या 'विमानस्थान' या तिसऱ्या प्रकरणात आहे. या विमानस्थानातील 'रोगभिषग्जितीय विमान' या आठव्या अध्यायात रोगाची चिकित्सा व उपाय यांची माहिती आहे. ती योग्य रीतीने व्हावी, याची पूर्वअट म्हणून गुरुशिष्यपरंपरा आणि त्यांच्या उत्तमतेची, पात्रतेची लक्षणे स्पष्ट केली आहेत. गुरु-शिष्यांत ज्ञानाचे यथार्थ आदान-प्रदान व्हावे याकरिता अध्ययन, अध्यापन आणि तद्विद्यसंभाषा हे शास्त्र जाणण्याचे तीन उपाय, तसेच वादमार्ग इत्यादी सांगितले आहेत. त्यातील तद्विद्यसंभाषेचे स्वरूप पुढीलप्रमाणे :

**तद्विद्यसंभाषा**

एका वैद्याने दुसऱ्या वैद्याबरोबर शास्त्रीय विषयाची चिकित्सा करणे म्हणजे तद्विद्यसंभाषा. त्या अनुषंगाने दोन किंवा अधिक विद्वानांमध्ये केली जाणारी शास्त्रीय चर्चा म्हणजे तद्विद्यसंभाषा, असे चरक नमूद करतात.

तद्विद्यसंभाषा ही अथांग ज्ञानाचे भांडार खुले करते. याचा अर्थ असा की ती सहभागी व्यक्तींना सभाचातुर्य, वाक्शक्ती(भाषाप्रभुत्व), आत्मविश्वास देणारी, त्यांचा संशय दूर करणारी, तसेच चर्चाविषयास स्थिरता देणारी असतेच, पण उपस्थित प्रेक्षक किंवा साक्षीदारांनाही हे सारे गुण ती बहाल करते. यावेळी होणाऱ्या खंडन-मंडनातून गुरुंकडून अध्ययनकाळात न लाभलेल्या नव्या ज्ञानाचा लाभ शिष्यांना आणि इतरांनाही होतो. तद्विद्यसंभाषा दोन प्रकारची असते: संधायसंभाषा आणि विगृह्य संभाषा. मित्रभावाने, सुहृद्भावनेने होणारा संवाद म्हणजे संधायसंभाषा आणि शत्रुभावनेने होणारा संवाद म्हणजे विगृह्यसंभाषा. संधायसंभाषेला 'अनुलोम संभाषा' आणि विगृह्यसंभाषेला 'प्रतिलोम संभाषा' असे म्हटले आहे. अनु = एका दिशेला, एका बाजूने जाणे आणि प्रति = बाजूच्या त्या विरुद्ध जाणे.

**संधायसंभाषा**

ज्ञान आणि विज्ञान यांनी परिपूर्ण असा पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष यांच्यातच ही संभाषा होते, म्हणजे वाद होऊ शकतो. वादातील पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष यांचे अपेक्षित अंगभूत गुण कोणते ? तर चरकाच्या मते, क्रोधरहित, विद्यासंपन्न, दुसऱ्यांच्या गुणांचा आदर करणारा, विनयशील, चतुर, सहनशील आणि मधुर भाषण करणारा मनुष्य असणे, हे ते गुण आहेत. अशा सद्गुणी पक्षाने (मग तो पूर्वपक्ष असो व उत्तरपक्ष) म्हणजे अशा गुणी विद्वानाने निश्चिंत मनाने वाद करावा, प्रश्न विचारावेत, 'माझा पराभव होईल' अशी भीती बाळगू नये, ज्याचे ज्ञान नाही, ते विषय परिषदेत उपस्थित करू नये, आपल्या सभ्यवर्तनाने आपले म्हणणे दुसऱ्यास व्यवस्थितपणे समजेल अशा रीतीने मांडावे. कोणत्याही परिस्थितीत विनयशील राहावे. वादात प्रतिपक्ष हरला तर त्याचे सर्व तऱ्हेने समाधान करावे व त्याचवेळी स्वतः प्रसन्न होऊ नये. एवढेच नव्हे, तर त्याच्या पराभवाची चर्चा इतर कोणाबरोबर करू नये ! असे दोघांनी केले *तर आणि तरच* वादाचा निष्कर्ष दोन्ही पक्ष सिद्धान्त, निर्णय म्हणून स्वीकारू शकतात.

**विगृह्यसंभाषा**

संधायसंभाषा ही दोन वादींमध्ये अपेक्षित असलेले सद्गुण असलेल्यांत होणारी चर्चा असते आणि असे सद्गुण नसलेल्यांत जी चर्चा होते ती म्हणजे विगृह संभाषा होय. विगृह्यसंभाषा ही वस्तुतः चर्चा नसतेच, ते भांडण असते. म्हणजे यात वाद न होता केवळ जल्प ('माझेच खरे' हा दुराग्रह) आणि वितंड

(केवळ दोष दाखवून बिनमुद्याचे भांडण करीत राहाणे) हेच प्रकार होतात. म्हणून त्यास विग्रह = तीव्र मतभेद असणारे म्हटले आहे.

इथे अर्थात हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, चरकाच्या मते, मूलतः वाद हा केवळ सुयोग्य समानशील विद्वानांतच होतो. पण कधीकधी प्रतिपक्ष आपल्यासारखा सुजाण नाही, तो केवळ जल्प व वितंड यासाठीच आला आहे, असे लक्षात येते. त्यावेळी संधाय संभाषा करणाऱ्या वादीने संयम राखावा.

पण मग त्याने अशावेळी नेमके काय करावे ? तर त्याने बोलणे सुरू करण्यापूर्वी प्रतिवादीची योग्यता (म्हणजे अयोग्यता) जाणून घ्यावी. हे काम फारच संवेदनशील, नाजूक असते, जणू ती आपलीच परीक्षा असते. अशी परीक्षा घेतल्याने सभाचतुर जाणत्यांकडून आपली प्रशंसा होते. या परीक्षेतून विरोधी पक्षाची परीक्षा होतेच पण आपलीही (सत्त्व)परीक्षा होऊन जाते. येथे उभयपक्षांतील व्यक्तींच्या गुणदोषांची ओळख पूर्ण होते. ती झाल्यानंतर पुढे, त्यातील कोणता गुण श्रेयस्कर आणि आणि कोणता दोष हानिकारक आहे, याची कसोटी घ्यावी. गुण कोणते ? तर श्रुत, विज्ञान, धारणा, प्रतिभासंपन्नता व वचनशक्ती हे सद्गुण विजयासाठी आवश्यक असतात.

1. श्रुत म्हणजे 'एकाच शास्त्राचे – विषयाचे ज्ञान आहे की अन्यही पूरक शास्त्रांचे ज्ञान आहे' हे तपासणे
2. विज्ञान म्हणजे प्रतिपाद्य विषयातील आधीच सिद्ध झालेले सिद्धान्त, औषधनिर्माणपद्धती, रोगीपरीक्षा, रोगनिदान, चिकित्सा
3. धारणा म्हणजे चर्चेत सांगितलेल्या गोष्टींचे त्वरित आकलन होणे व त्यांचे योग्यवेळी म्हणजे चर्चेत योग्य ठिकाणी स्मरण होणे
4. वचनशक्ती याचा अर्थ आपल्याला असलेले शास्त्रीयज्ञान सोप्या भाषेत स्पष्ट करता येईल इतके भाषाप्रभुत्व आपल्याकडे असणे.

गुण पाहिले, आता दोष कोणते ? तर उत्तर न देता रागावणे, विषयाचे ज्ञान नसताना (अवैशारद्य) विषय उकरून काढणे, विरुद्धपक्षास अकारण घाबरणे, त्याने मांडलेला विषयच विसरून जाणे, प्रश्नोत्तरकालात बेसावध असणे-दुसरीकडेच लक्ष देणे, हे दोष असले की वादाचे रूपांतर विगृह्यसंभाषात होते.

पुढे चरक म्हणतो, की "विगृह्यसंभाषेत वादी-प्रतिवादींनी एकमेकांच्या गुणदोषांची पारख करावीच, कारण दोघेही विजिगीषु असतात. त्यामुळे

दुसऱ्याची दुर्बलता लक्षात येत नाही तोपर्यंत विजय मिळणे कठीण असते ! गुणदोष शोधण्याच्या कसोटीत प्रतिवादी कोणत्या विषयांत अपात्र आहे, याचे ज्ञान होते. त्याचवेळी स्वतः वादीच त्या विषयात पात्र व पारंगत आहे, याचे ज्ञान होते. याचा फायदा घेऊन अशा वेळी वादीने 'ज्या विषयात प्रतिवादी अपात्र आहे आणि आपण स्वतः पात्र आहोत' अशाच विषयांचा प्रयोग सुरू करावा. *फक्त आपल्या स्वहिताचा विचार करून* विगृह्यसंभाषा सुरू करावी. अन्य कोणताही विचार करू नये.

विगृह्यसंभाषावादाचे स्वरूप लक्षात घेऊन चरकाने प्रतिवादीचे तीन प्रकार केले आहेत - प्रवर (उत्तम), प्रत्यवर (अधम), आणि सम. हे प्रकार केवळ वादाच्या दृष्टिकोनातून केले आहेत. कुल,शील, जाती इत्यादी दृष्टिकोनातून नाही..

**परिषदेचे दोन प्रकार**

यानंतर चरकपरिषदेचेही प्रकार सांगतो. ते मुख्यतः दोन आहेत. ज्ञानवती परिषद् आणि मूढपरिषद. आता, उघडच ज्ञानवती परिषद् म्हणजे ज्ञानी लोकांची संभाषा आणि मूढपरिषद् म्हणजे मूर्ख लोकांची परिषद्. मूढांची परिषद अर्थातच जल्प, वितंड यांनीच संपन्न होते !

आता, इथे चर्चकांची ज्ञानी व मूर्ख अशी वर्गवारी झाली असतानाही प्रत्यक्षात चर्चेसाठी जावे तर मात्र वेगवेगळे अनुभव येतात. म्हणजे ज्ञानी चर्चेसाठी जातो तेव्हा अशा दोन प्रकारांत विभागलेले चर्चक, गट, परिषद लाभतील याची खात्री देता येत नाही. म्हणजे ज्ञानी माणसाला ज्ञानीच भेटेल असे नाही, मूर्खही भेटू शकेल; पण ते आधी माहीत नसते. म्हणून चरक पुन्हा या दोन्हीं परिषदांचे तीन उपप्रकार चरक करतो. ते असे (*सुहृत्परिषत्, उदासीन परिषत्, प्रतिनिविष्ट परिषेचेति*) :

**अ) ज्ञानवती परिषदेचे उपप्रकार**

1. ज्ञानवतीसुहृदपरिषद : ज्ञानीमित्रांची परिषद = निश्चित तर्कशुद्ध निर्णय देणारी.
2. ज्ञानवतीउदासीनपरिषद : ज्ञानी, पण हारजीत, निष्कर्षाप्रति उदासीन असणारी.
3. ज्ञानवतीप्रतिनिविष्टपरिषद : ज्ञानी पण 'माझेच खरे' वाल्या दुराग्रही अहंकारी विद्वानांची !
4.

**ब) मूढपरिषदेचे उपप्रकार**

इथे मूळ चरकसंहितेत "मूढपरिषदेचेही असेच प्रकार होतात", एवढेच नमूद केले आहे. त्यावर इतरांनी केलेल्या भाष्यात, टीकेतही कुठेही मूढ परिषदेचे उपप्रकार दिलेले नाहीत. मूळ सूत्र असे : *मूढायां तु सुहृत्परिषद्युदासीनायां वा ज्ञानविज्ञान ....* ). त्यामुळे हे प्रकार पुढीलप्रमाणे करता येतील, असे मला वाटते :

1. मूढसुहृदपरिषद् : मूर्खमित्रांची परिषद् = निर्णय न देणारी.
2. मूढउदासीनपरिषद् : मूर्ख आणि हारजीत, निष्कर्षाप्रति उदासीन असणारी.
3. मूढप्रतिनिविष्टपरिषद् : मूर्ख आणि 'माझेच खरे'वाल्या दुराग्रही अहंकारी मूर्खांची !

चरक म्हणतो, "ज्ञान, विज्ञान, वचन (प्रश्न), प्रतिवचन (उत्तर) यांनी युक्त असलेल्या ज्ञानी पण प्रतिनिविष्ट म्हणजे दुराग्रही अहंकारी लोकांच्या परिषदेत आणि अज्ञानी तसेच शत्रू (प्रतिनिविष्ट) असलेल्या मूर्खांच्या परिषदेत कोणत्याही शहाण्या (ज्ञानी) विद्वानाने वाद करू नये." तर मग कुणाशी वाद घालावा ?

तर चरक तीन प्रकारे वाद करावा असे स्पष्ट करतो.

(१) पहिला : "सुहृद परिषद् किंवा मूढ उदासीन परिषद्, अशा दोन्ही परिषदेत ज्ञान, विज्ञान, वचन (प्रश्न), प्रतिवचन (उत्तर) यांनी युक्त नसणारे आणि जे विद्वान, प्रतिष्ठित लोकांशी वैर धरणारे लोक असतात. त्या दोन्ही ठिकाणच्या लोकांशी वाद घालावा !" म्हणजे मित्रांमध्ये आणि शत्रूंमध्ये असे मूर्ख लोक असतात, त्यांच्याशी वाद घालण्यास हरकत नाही. पण अशा वेळेस त्यांच्याशी जल्प करावा. म्हणजे त्यांच्याशी बोलताना मोठमोठी लंबीचवडी, एकमेकांत गुंतलेली वाक्ये करावीत, ज्यांचे स्पष्टीकरण केल्याशिवाय त्यांना समजणारच नाहीत अशी दुर्बोध वाक्ये वापरावी. दुर्बोधशब्द वापरताना म्हणावे की "तुम्ही काही बोलत नाही याचाच अर्थ तुमचा पराभव झाला आहे. आपली प्रतिज्ञा तुम्ही पुरी करू शकत नाही." हे वारंवार म्हणत राहावे. त्याला हरवावे. समजा त्याने पुन्हा चर्चेसाठी बोलाविले तर म्हणावे, " तू अजून एक वर्षभर अभ्यास कर आणि मगच माझ्याशी बोलायला ये. गुरूची ठीक तऱ्हेने तू उपासना केली नाहीस, असे दिसते" किंवा म्हणावे, " तुला आहे तेवढे ज्ञान पुरेसे

आहे, अधिक अभ्यासाची तुला गरज नाही. (कारण) चर्चेत जो एकदा पराजित होतो त्याला नेहमीच शहाणे पंडित पराजित मानतात (तू पराजित झालेला आहेसच). अशा पराजिताला संभाषापरिषदेत पुन्हा प्रवेश नाही"

(२) दुसरा : ज्ञानवती आणि मूढ सुहृत् परिषदेत जर कुणी आपल्यापेक्षा कमी दर्जाचा अथवा समान दर्जाचा असेल तर त्याच्याशीही विगृह्यसंभाषा करावी, असे चरक सांगतो. म्हणजे मित्रांपैकी एखादा किंवा ते सारेच मित्र ज्ञानी आहेत पण प्रस्तुत चर्चाविषयाच्या संदर्भात विरुद्धपक्षाचे आहेत; अशा लोकांशी चर्चा करताना विगृह्यसंभाषा(च) करावी.

(३)तिसरा : उदासीन परिषद् आहे पण ती ज्ञानी आहे की मूढ हे अद्यापि माहीत नाही, अशी स्थिती असेल तर कोणता निर्णय घ्यावा ? चरक म्हणतो, "अवधानश्रवण (आपला तर्क, युक्तिवाद लक्षपूर्वक ऐकणारे), वचन, प्रतिवचन यांनी ज्ञानी असलेली अशी परिषद् असेल तर तिथे आपले म्हणणे मांडताना प्रतिपक्षाची चाचपणी करावी आणि मग निर्णय घ्यावा. म्हणजे जर प्रतिपक्ष प्रस्तुत चर्चाविषयाच्या संदर्भात सबल असेल तर वाद करू नये; उलट विषयाला जल्प, वितंडा होणार नाही, असे पाहून एकमताकडे यावे. पण जर प्रतिपक्ष प्रस्तुत चर्चाविषयाच्या संदर्भात दुर्बल असेल तर त्याच्यावर विजय मिळविण्यात हयगय करू नये.

हा पराभव करण्याचे तन्त्र कोणते ? चरक म्हणतो, जर प्रतिपक्ष.....

1. "अज्ञानी, श्रुतहीन (प्रस्तुत विषयाचे आणि अन्यही पूरक विषयांचे - शास्त्रांचे ज्ञान नसणारा) असेल तर त्यास मोठमोठी शास्त्रीय उदाहरणे द्यावीत
2. विज्ञानहीन असेल तर त्यास उमजणार नाही अशी वाक्यरचना करावी
3. त्याच्याकडे धारणाशक्तीचा अभाव असेल तर जटील, लांबलचक, संकीर्ण वाक्यरचना करावी
4. प्रतिभाहीन असेल तर अनेकार्थी शब्दयोजना करावी
5. वचनशक्तिहीन (भाषाप्रभुत्व नसलेला) असेल तर त्याचे उत्तर झिडकारावे
6. रागीट असेल तर त्यास चिडवावे
7. भित्रा असेल तर घाबरून टाकावे
8. बेसावध असेल तर नियमांत अडकवून त्याचा गोंधळ उडवून द्यावा.

अशा रीतीने प्रतिपक्षाचा संपूर्ण पराजय करावा ! अर्थातच हा प्रतिपक्ष मूढ

प्रतिनिविष्ट असतो. म्हणजे मूर्ख विरोधक असतो.

या सगळ्या गाळणीतून चरक दोन व्यापक नीतिनियम देतो :

(अ) जर प्रतिपक्ष ज्ञानवतीसुहृदपरिषद् असेल तर त्यांच्याबाबतीत विगृह्यसंभाषा करू नये. म्हणजे विगृह्यसंभाषा आपल्यापेक्षा बळ, बुद्धि आणि ज्ञान यांत जे श्रेष्ठ आहेत, त्यांच्याशी करू नये'. अशा वेळी अशा परिषदेत कोणताही वाद युक्तीनेच करावा, प्रतिपक्षाने तर्कसंगत वाद केला तर त्याचा स्वीकार करावा. येथे कोणतीही निरर्थक चर्चा करू नये.

(ब) जर प्रतिपक्ष मूढ प्रतिनिविष्ट असेल तर काहीवेळा विगृह्यसंभाषा काही लोकांना अत्यंत संतप्त करते. मग अशी क्रुद्ध व्यक्ती काहीही अनहित करू शकते. म्हणून सभ्यपुरुष परिषदेमध्ये कलह पसंत करीत नाहीत.

या नियमांच्या अनुसार वादविवाद करावा. विगृह्यसंभाषा ही मूलतः काहीही करून दुसऱ्याला पराजित करणे, एवढाच मर्यादित हेतू ठेवते, ती सिद्धान्त न देता कलह मात्र निर्माण करते, ती जल्पप्रधान आहे (स्वतःचा विजय, बस्स ! दुसरे काही नाहीच !!) ती ज्ञानाला, शास्त्राला उपकारक, गति देणारी नाही. म्हणून ती टाळावी.

(अपूर्ण )

ईमेल: shriniwas.sh@gmail.com

## चुकीची दुरुस्ती

*आजचा सुधारक* च्या नोव्हेंबर 2016 च्या अंकात 'पुस्तक परिचय : द् सर्कल' ची लेखिका 'प्रियांका ठुबे' असे अनुक्रमणिकेत छापले गेले आहे (पान क्र २). प्रत्यक्ष लेखाच्या इथे 'प्राजक्ता ठुबे' असे नाव छापले गेले आहे (पान क्र ३५). योग्य नाव 'प्राजक्ता ठुबे' असे आहे. अनुक्रमणिकेत ते चुकीचे छापले गेले आहे. - **क्षमस्व !**

# चलनबंदी : एक अर्थाभ्यासीय दृष्टिकोन

*आनंद मोरे*

*चलनबंदी, पैसा, अर्थव्यवस्था, विनिमय*

---

मोदीसरकारने घेतलेल्या चलनबंदीच्या निर्णयाचे हादरे समाजातील प्रत्येक वर्गाला बसले. ह्या कृतीचे राजकीय विश्लेषण अनेक माध्यमांतून होत आहे व ह्यापुढेही होत राहील. मात्र अर्थाभ्यासाच्या दृष्टिकोनातून लिहिलेला हा लेख वाचकांना विषयाशी संबंधित काही मूलभूत संकल्पनांचा परिचय करून देईल, त्यासोबतच 'पैसा म्हणजे काय?' ह्या विषयावरील 'आ.सु'तल्या चर्चेला पुढे नेईल.

---

**प्रस्तावना**

सरकारने डिमॉनेटायझेशनचा निर्णय जाहीर केला आणि एक दोन मित्रांनी मला या संकल्पनेबद्दल माहिती विचारली. म्हणून हे लेखन केले आहे. यात डिमॉनेटायझेशनचा भारत सरकारचा निर्णय योग्य अथवा अयोग्य याची चर्चा केलेली नाही. माझ्या दृष्टीने सगळ्या आर्थिकनिर्णयांना सामाजिक, राजकीय आणि व्यवस्थापकीय बाजू असते. उत्कृष्ट आर्थिकनिर्णय केवळ व्यवस्थापकीय चुका किंवा राजकीय गाढवपणामुळे चुकीचे ठरणे किंवा आर्थिकदृष्ट्या हाराकिरीचा निर्णय केवळ उत्कृष्ट सामाजिक भान आणि सहृदय राजकीय व व्यवस्थापकीय कौशल्य यामुळे समाजाला पुढे नेणारे ठरू शकतात हे मला मान्य आहे. परंतु माझा हा लेख केवळ या प्रचंड निर्णयाच्या मागील आर्थिक संकल्पनांचा ऊहापोह करणारा आहे. माझी जबाबदारी, संकल्पना तिच्या शुद्धस्वरूपात तिच्या योग्यायोग्यतेबद्दल टिप्पणी न करता मांडण्याची आहे, असे मी मानून चालतो.

संस्कृतचा मराठी भाषेवरील प्रभाव आणि तंतोतंत इंग्रजी भाषांतराचा आग्रह घोळ यामुळे आपण **इकॉनॉमिक्सला अर्थशास्त्र** असा प्रतिशब्द वापरतो. वाचकांचा गोंधळ उडू नये म्हणून मीदेखील हा शब्द लेखात ठिकठिकाणी वापरला आहे. परंतु **मी 'अर्थशास्त्राला', 'अर्थाभ्यास' मानतो.** एकदा हे शास्त्र नसून लोकांच्या अर्थविषयक, वैयक्तिक आणि सामूहिक वागणुकीचा अभ्यास

आहे, हे कळले की मग आपण या विषयाकडून अचूक उत्तराची अपेक्षा न बाळगता दिशादर्शन करणाऱ्या ध्रुवताऱ्याप्रमाणे असलेले त्याचे स्वरूप समजून घेऊ शकतो आणि आपल्या सद्यःकालीन त्रासांना कमी करण्यासाठी उपलब्ध असलेल्या अनेक पर्यायांपैकी काही पर्याय निवडू शकतो. भारतसरकारने देखील हेच करावे अशी माझी अपेक्षा आहे. आणि **सरकारने आता जो पर्याय निवडला आहे त्याच्या मागील संकल्पना काय? ते समजावून सांगणे ही या लेखनामागील माझी भूमिका आहे. यापेक्षा दुसरा पर्याय कुठले होते त्याची चर्चा या लेखनात केलेली नाही, हे वाचकांनी ध्यानात घेऊन मगच पुढील लेखन वाचावे, ही विनंती.**

1. **पैसा म्हणजे काय** ?

'ज्याच्याकडे जास्त पैसा, तो श्रीमंत' अशी आपली एक साधारण समजूत असते. पण पैसा म्हणजे काय? या प्रश्नाचे सुस्पष्ट उत्तर आपल्यापैकी अनेकांना माहिती नसते. वर्गात शिकवताना मी मुलांना नोट काढून दाखवतो आणि त्यावरती लिहिलेले वाचायला लावतो. त्यावर स्पष्ट लिहिलेले असते की तुमच्या हातात जे आहे ते आरबीआय (RBI) च्या गव्हर्नरने दिलेले '**पैसा देण्याचे वचन/ हमी आहे**'. हे कळले की मग मुलांचा पुढचा प्रश्न असतो "पैसा म्हणजे काय?" तेव्हा मी कायम एकच उत्तर देतो, "***पैसा म्हणजे वस्तू आणि सेवा.*"** *आपण खूप पैसेवाले झालो म्हणजे श्रीमंत होऊ हे आपल्याला समजते, तर मग खूप श्रीमंत होण्याचा एकमेव राजमार्ग म्हणजे इतरांना हव्या असलेल्या जास्तीत जास्त वस्तू आणि सेवांचे उत्पादन आपल्याला करता आले पाहिजे. मग आपण आपोआप पैसेवाले होऊ. ज्या नोटा किंवा नाणी आपण वापरतो, तो पैसा नसून केवळ विनिमयाचे साधन आहे. खरा पैसा आपण उत्पादन करत असेलल्या वस्तू आणि सेवा हाच आहे. आणि तो साठवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे नोटा किंवा नाणी साठवणे नसून त्या पैशाला चल किंवा अचल संपत्तीमध्ये रूपांतरित करणे हा आहे."*

म्हणजे सरकार पैसा तयार करत नसून आपण सगळे तयार करत असतो. सरकार केवळ चलन उपलब्ध करून देते त्याला कायद्याचे पाठबळ देते आणि आपण उत्पादित केलेल्या वस्तू आणि सेवांच्या विनिमयासाठी आपल्याला मदत करते.

वरील मुद्दा नीट वाचला तर असे ध्यानात येईल की, कुठल्याही अर्थव्यवस्थेची दोन चाके असतात. एक म्हणजे वस्तू आणि सेवा, तर दुसरे

म्हणजे त्यांच्या विनिमयासाठी लागणारे आणि सरकारने कायदेशीरपणे उपलब्ध करून दिलेले चलन. आदर्श व्यवस्थेमध्ये ही दोन्ही चाके सारख्या आकाराची असली पाहिजेत. म्हणजे उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांची किंमत आणि साठवून ठेवलेल्या संपत्तीची किंमत यांच्या बेरजेइतकेच चलन छापले गेले पाहिजे. पण असे करायचे असेल तर प्रत्येकाला आपण उत्पादित केलेल्या वस्तू किंवा सेवा आधी RBI ला दाखवाव्या लागतील आणि मग त्यानुसार RBI कडून विनिमयासाठी पैसा छापून घ्यावा लागेल. त्यामुळे RBI समोर रोज मैलोगणती रांगा लागतील आणि अर्थव्यवस्था या शब्दातील व्यवस्थेचा बोजवारा उडेल.

**2. दोन चाकांची मोटरसायकल**

असे घडू नये म्हणून आधुनिक अर्थव्यवस्थेने नवा मार्ग काढला आहे. तो समजून घेण्यासाठी आपण अर्थव्यवस्थेला मोटरसायकल समजूया. मग तिचे पुढचे चाक म्हणजे वस्तू आणि सेवा. हॅण्डल आणि चालक म्हणजे सरकार. मागचे चाक आणि चेन म्हणजे चलन. इंजिन म्हणजे RBI आणि तिच्या हाताखाली काम करणाऱ्या बँका, अशी कल्पना करूया. आता मोटरसायकल तर तयार आहे पण या मोटारसायकलचा फक्त एकच त्रास असतो. विक्रेते आणि ग्राहक दोघे मिळून या मोटारसायकलच्या दोन्ही चाकांचा आकार सारखा बदलवत असतात.

जेव्हा उत्पादन तयार होते तेव्हा मोटरसायकलच्या पुढच्या चाकाचा आकार मोठा होत असतो आणि जेव्हा उत्पादन नष्ट होते तेव्हा त्याचा आकार छोटा होत असतो. जेव्हा RBI अर्थव्यवस्थेत नवीन नोटा छापून सोडते तेव्हा मागील चाकाचा आकार मोठा होत असतो. तसेच जेव्हा समाजकंटक खोट्या नोटा अर्थव्यवस्थेत सोडतात तेव्हादेखील मागील चाकाचा आकार मोठा होत असतो. जेव्हा आपण बाथरूमच्या छतात किंवा तळघरात खड्डे खणून त्यात हंडे ठेवून त्यांत नोटा - नाणी लपवतो किंवा बँकेच्या लॉकरमध्ये नोटा - नाणी लपवतो, किंवा नोटा फाडतो किंवा नाणी हरवतो, किंवा आपल्या नजरचुकीने जेव्हा शर्ट किंवा पॅन्टच्या खिशातील नोटा भिजून त्यांचा लगदा होतो, तेव्हा मोटरसायकलच्या मागील चाकाचा आकार छोटा होत असतो.

गंमत म्हणजे कुठल्याही वेळी या दोन्ही चाकांचा निश्चित आकार किती मोठा किंवा छोटा आहे याचे काही ठोस उत्तर कुणाकडेही नसते. म्हणून मग आपल्या या आधुनिक अर्थव्यवस्थेच्या दोन्ही चाकांचे नियंत्रण दोन वेगवेगळ्या

संस्थांकडे दिलेले आहे. त्यांचे काम असते आपल्या नियंत्रणाखाली असलेल्या चाकाचा आकार निर्धारित करायचा आणि दुसऱ्याला सांगायचा, जेणेकरून दुसऱ्याला त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या चाकाचा आकार किती ठेवायला हवा त्याचा अंदाज येईल.

वस्तू आणि सेवांनी बनलेल्या पुढच्या चाकाचे नियंत्रण सरकार करते. त्याच्या आकाराचा अंदाज घेण्यासाठी आणि त्याला नियंत्रित करण्यासाठी, सरकार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कररचना वापरते. त्यायोगे देशात वस्तूंचे आणि सेवांचे किती उत्पादन झाले आहे त्याचा अंदाज लावते. लक्षात ठेवायचं की आपल्या नियंत्रणाखाली असलेल्या चाकाच्या आकाराबाबत सरकार केवळ अंदाज लावू शकते. तो वस्तुस्थितीजवळ जावा म्हणून सरकार कायम प्रयत्नशील असते. करांचा आराखडा तोच ठेवला तरी कररचना सहसा एक वर्षासाठी ठेवली जाते. सरकार आपले करविषयक धोरण वर्षातून एकदा 'बजेट' वापरून जाहीर करते. बजेट वापरून सरकार आपल्या अंदाजाला सावरून घेते, येणाऱ्या वर्षाला दिशा देते. अशया तऱ्हेने कराच्या आकडेवारीवरून देशात वस्तू आणि सेवांचे किती उत्पादन झाले त्याचा अंदाज लावत असताना सरकार कररचनेत फेरफार करत वस्तू आणि सेवांच्या उत्पादनाचे नियंत्रणदेखील करत असते.

विनिमयासाठी चलन उपलब्ध करून देणाऱ्या दुसऱ्या चाकाचे नियंत्रण RBI करते. RBI अंदाजे पैसा छापते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यामुळे अर्थव्यवस्थेत फिरणारे चलन आणि लोकांनी उत्पादित केलेल्या वस्तू आणि सेवा यांचा ताळमेळ बसत नाही. कधी चलन जास्त होते तर कधी वस्तू आणि सेवांचे उत्पादन. चलन जास्त झाले की वस्तूंच्या किमती वाढतात आणि कमी झाले की वस्तू आणि सेवांची मागणी कमी होऊन अर्थव्यवस्थेचा वेग मंदावतो. उत्पादन आणि चलन यांत ताळमेळ बसावा आणि चलनफुगवटा किंवा तुटवडा होऊ नये म्हणून RBI देशाचे चलनविषयक धोरण (Monetary Policy) ठरवते. हे धोरण दर दोन महिन्यांनी म्हणजे वर्षातून सहावेळा ठरवले जाते.

करव्यवस्थेत RBI ढवळाढवळ करत नाही तर चलनव्यवस्थेत सरकारने ढवळाढवळ करू नये अशी अपेक्षा असते. पण लोकांना चलन म्हणजे श्रीमंती वाटत असल्याने सगळ्यांना सुखावण्यासाठी सरकारला लोकांच्या हातात जास्त पैसा खेळू द्यायचा असतो. म्हणून सरकार, RBIने आपले चलनविषयक धोरण

शिथिल करून अर्थव्यवस्थेत जास्तीचा पैसा येऊ द्यावा अशी अपेक्षा करत असते. अनेकदा आरबीआयच्या प्रमुखांचे सरकारशी अनेकदा खटके उडतात ते यामुळेच. असो. हे विषयांतर इथेच थांबवून मी पुन्हा चाकांच्या आकाराकडे वळतो.

**3. कोंबडी आधी की अंडे?**

मागील भागात आपण बघितले की आपल्या मोटारसायकलरूपी अर्थव्यवस्थेचे पुढील चाक वस्तू आणि सेवांचे बनलेले असते. हे चाक सजीव असल्यासारखे वागते. नैसर्गिक घटना आणि मानवी उद्योग यांमुळे नवनवीन उत्पादन निर्माण तरी होत असते किंवा नष्ट तरी होत असते. त्यामुळे वस्तू आणि सेवांनी बनलेल्या या पुढच्या चाकाचा आकार सारखा मोठा किंवा छोटा होत असतो. करव्यवस्थेमुळे याच्या आकाराचा थोडाफार अंदाज सरकारला येत असतो. देशाला श्रीमंत करायचा ध्यास घेतलेल्या प्रत्येक सरकारवर या पुढल्या चाकाला छोटे होऊ न देता कायम मोठे करण्याची जबाबदारी असते.

पण उत्पादन करण्यासाठी **जोखीम पत्करण्याची प्रवृत्ती, कल्पनाशक्ती आणि साधनसंपत्ती** तिन्ही लागतात. आणि एकाच व्यक्तीकडे या तिन्ही गोष्टी असतील अशी खात्री प्रत्यक्ष देवसुद्धा स्वतःला देऊ शकत नाही. त्याशिवाय, अनेकदा एखाद्या उद्योगासाठी आवश्यक ती साधनसंपत्ती विखुरलेल्या स्वरूपात अनेक लोकांच्या मालकीची असते. अश्या विखुरलेल्या साधनसंपत्तीला आणि कल्पनाशक्तीला एकत्र आणण्यासाठी चलनाची गरज भासू लागते.

आपण आधी पाहिले की वस्तू आणि सेवांचे उत्पादन म्हणजे खरा पैसा आणि त्याचे विनिमय करण्यासाठी आपण जे वापरतो ते फक्त चलन. या मांडणीमुळे आपली अशी समजूत होते की आधी उत्पादन तयार होते मग चलन छापले जाते. पण आपल्या उद्योजकाला तर उत्पादन करायच्या आधीच केवळ साधनसंपत्तीला एकत्र आणण्यासाठी चलन हवे आहे. हा प्रकार तर **कोंबडी आधी की अंडे?** या वैश्विक प्रश्नासारखा झाला. फक्त अर्थशास्त्रात आपण त्यातले शब्द बदलून '**पैसा आधी की उत्पादन?**' असे म्हणतो.

कोंबडी आधी की अंडे?, या प्रश्नाचे उत्तर, माझ्या लेखीतरी '**आधी कोंबडी**' असेच आहे. फक्त ही पहिली कोंबडी अंड्यातून आलेली नसते, तर तिचा जन्म दुसऱ्या कुठल्यातरी अपघातातून झालेला असतो.

त्याचप्रमाणे, अर्थव्यवस्थेत पहिला पैसा (पहिली कोंबडी) उत्पादनातून न

येता सरकारने RBI ला दिलेल्या उत्पादनाच्या वचनातून येतो. **एका अर्थी सरकारच्या विनंतीवरून RBI ने छापलेला हा पहिला पैसा म्हणजे RBI ने सरकारला दिलेले कर्ज असते.**

हा कर्जाचा पैसा आपण सर्वजण वापरत असल्याने त्याची परतफेड करण्याची जबाबदारी आपल्या सगळ्यांवर असते. **पण RBI परतफेड न मागता आपल्याला उत्पादन करा आणि पैसा खेळता ठेवा इतकेच सांगत असते.** हा कर्जाचा मुद्दा थोडा कठीण असला तरी नीट लक्षात ठेवा कारण पुढे जेव्हा आपण डिमॉनेटायझेशनच्या फायद्यांबद्दल बोलू तेव्हा याची गरज लागेल.

एकदा का हे उत्पादनाशिवाय केवळ सरकारच्या भरवश्यावर छापलेले पहिले चलन वापरात आले की नंतर मात्र या पैशामुळे विनिमय सोपा होतो आणि उत्पादनाचे चाक मोठे होऊ लागते. मग उत्पादनातून पैसा, पैशामुळे उत्पादन, पुन्हा उत्पादनातून पैसा हे चक्र सुरू होते, एखाद्या सजीवाप्रमाणे स्वतःला वाढवू लागते. म्हणजे पुढील चाकात प्राण फुंकून त्याच्या वाढीस सुरवात करून देण्याचे काम मागील चाकाला करावे लागते.

4. **चाकांच्या आकाराचे मोजमाप**

RBI ने सरकारच्या भरवशावर देशाला दिलेल्या या कर्जाची कल्पना कळली तरी अनेकांचा असा गैरसमज होऊ शकतो की RBI जितका पैसा छापते तितकाच पैसा देशात खेळत असतो. हा समज चुकीचा आहे, कारण बँका क्रेडिट क्रिएशनद्वारे (कर्ज देऊन) अधिकचा पैसा खेळवत असतात. पण त्यावरही आरबीआयचे नियंत्रण असते.

आरबीआयने ठरवलेल्या कॅश रिझर्व्ह रेशो (CRR) आणि स्टॅच्युटरी लिक्विडीटी रेशोच्या (SLR) विरुद्ध गुणोत्तरात प्रत्यक्ष चलनठेवीवर कर्जचलन तयार होते. (बँकेत आलेल्या ठेवीचा किती भाग बँकेने RBI कडे ठेव म्हणून द्यायचा त्याला CRR म्हणतात. तर किती भाग स्वतःकडे धरून ठेवायचा त्याला SLR म्हणतात.) प्रत्यक्षात अगदी असेच होत नसले तरी सैद्धान्तिकरीत्या असे म्हणता येते की CRR आणि SLR ची बेरीज जर १०% असेल तर १० पट कर्जचलन (१०० रुपयांच्या प्रत्यक्ष चलनावर १००० रुपयांचे कर्जचलन); जर २०% असेल तर पाच पट कर्जचलन (१०० रुपयाच्या प्रत्यक्ष चलनावर ५०० रुपयांचे कर्ज चलन) तयार होऊ शकते.

यावरून, कुठल्याही देशात छापलेला आणि कर्ज देऊन तयार झालेला

असा दुहेरी पैसा खेळत असतो असा साधा निष्कर्ष आपण काढू शकतो. ढोबळमानाने सांगायचे झाल्यास आरबीआयने छापलेल्या पैशाला M1 म्हणतात त्याशिवाय M2, M3 आणि M4 अश्या संज्ञादेखील अर्थशास्त्रात वापरल्या जातात.

आता हे M1, M2, M3 आणि M4 म्हणजे काय? त्यांची रक्कम निर्धारित करण्याची पद्धत काय? ती निर्दोष आणि अचूक असते का? त्यात कुठल्या त्रुटी असतात? हा मोठा विषय आहे. त्यातले जे आपल्याला आवश्यक ते अगदी थोडक्यात सांगतो. कुठल्याही देशात किती पैसा खेळता असतो?, ते मोजण्याचे आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्य झालेले चार मापदंड आहेत. त्यांना M1, M2, M3 आणि M4 असे म्हणतात. त्यांपैकी M1 मध्ये आरबीआयने आणि/अथवा सरकारने छापलेल्या चलनी नोटा, नाणी आणि चलनात विनासायास बदलली जाऊ शकणारी इतर साधने, केवळ यांचाच समावेश होतो. म्हणून त्याला संकुचित मापदंड म्हणतात तर तर बाकीच्या तिघांत, अधिकृत छापील चलनाबरोबर बँकांच्या क्रेडिट क्रिएशनमुळे तयार झालेला पैसादेखील येतो म्हणून या तिघांना विस्तारित मापदंड म्हणतात. सरकारचा सध्याचा निर्णय M1 वर रोखलेला आहे त्यामुळे मी बाकीच्या मापदंडांबद्दल बोलत नाही.

M1 मध्ये छापलेला पैसा असल्याने याची मोजदाद करणे सोपे असते. त्यासाठी नोटांवर सिरीयल नंबर टाकले जातात. आणि नाण्यांचादेखील हिशोब ठेवला जातो. या चलनाचा पुरवठा आपल्याला बँकांमार्फत होत असतो. त्यामुळे त्यावर नियंत्रण ठेवणे सोपे असते असे आपल्याला वाटते. उत्पादन केलेल्या वस्तू आणि सेवांपेक्षा पैसा जास्त झाला की महागाई वाढते. म्हणून दर दोन महिन्यांनी RBIआपले चलनविषयक धोरण ठरवत असते. ज्यात देशात खेळणारा पैसा पुन्हा मागे घेतला जातो किंवा अजून पैसा देशात सोडला जातो. यातून उत्पादनरूपी पुढील चाकाबरोबर मागील चाकाचा आकार जुळवून घेतला जातो. त्याचबरोबर निसर्गाच्या लहरीपणामुळे, माणसांच्या आळशीपणामुळे आणि नासाडी करण्याच्या वृत्तीमुळे पुन्हा पुन्हा मरगळ येऊ शकणाऱ्या उत्पादनाच्या चाकाला नवसंजीवनी दिली जाते. (अपूर्ण)

पूर्वप्रसिद्धी: फेसबुक

ईमेल: anandmore@outlook.com

# सावरकर हे नवभारताचे राष्ट्रपिता, गांधी सावत्रपिता

-***आशिष नंदी*** (मुलाखतकार: अजाज़ अश्रफ, अनु. प्रज्वला तट्टे)

*सावरकर, गांधी, हिंदुत्ववाद, हिंदुधर्म, जागतिकीकरण*

---------------------------------------------------------------------------

प्रख्यात मनोविश्लेषक-राजकीय भाष्यकार आशिष नंदी ह्यांची ही ताजी मुलाखत त्यांची मार्मिक निरीक्षणे, वादग्रस्त विधाने ह्यांनी भरलेली आहे. पण त्यापलीकडे जाऊन विचार केला तर तीतून आपल्याला परंपरा व भविष्य ह्यांच्याकडे बघण्याची मर्मदृष्टी सापडू शकते. वाचक ही चर्चा पुढे नेतील अशी अपेक्षा आहे.

---------------------------------------------------------------------------

***अश्रफ** : आपले पुस्तक 'Regions of Naricism, Regions of Despair' याची सुरुवातच अशी आहे की, 'या निबंधामध्ये मी अशा भारताबद्दल लिहिलेले आहे, जो 40 वर्षांपूर्वी मी ज्या भारताबद्दल लिहायचो त्याच्याहून खूप भिन्न आहे'. ह्या बदलांचा प्रभाव उद्याच्या भारतावर कसा पडलेला असेल?*

***नंदी*** : प्रथम मला एक सर्वंकष वास्तव मांडू द्या. एक - भारताजवळ स्वतःचा असा स्वतन्त्र 'दृष्टिकोन' राहिलेला नाही. प्रगतीच्या चढाओढीत सामील झालेल्या जगातील इतर अनेक विकसनशील देशांच्या आणि भारताच्या दृष्टिकोनात कसलाच फरक राहिलेला नाही. गरिबी, मागासलेपणा, न्यूनगंड (indignity) हे घालवण्याच्या बाता मारणारे एकसुरी एकसाची स्वप्न सर्व विकसनशील देशांना दाखवले गेले आहे आणि आपणही ते आपले समजून बघायला लागलेलो आहोत. थोडक्यात आपले स्वतःचे स्वप्न आपल्यापासून हिरावून घेतले गेले आहे. चीनसहित सर्व विकसनशील देशांनी ते मागासलेले आहेत हे स्वीकारले आहे. आपलेही भविष्य आता ह्या अशा एकसाची राष्ट्र-राज्यांप्रमाणे असणार आहे. खरे तर ह्या तथाकथित राष्ट्र-राज्यांचे भविष्यातले स्वप्न हे 300 वर्षं जुने आहे. पण त्यांना त्याचे भान नाही. आणि आता आपणही त्यांचीच री ओढायला लागल्यामुळे आता आपले स्वतःचे काही वेगळे भविष्य असण्याची शक्यताही आता मावळली आहे.

***अश्रफ :*** आपण ज्या एकसरी. एकसाची स्वप्नाबद्दल बोलत आहात ते विकासाच्या शहरी-औद्योगिक प्रतिमानाचे स्वप्न आहे का?

***नंदी*** : होय. आणि ते आपण स्वीकारले ते त्याची अजिबात चिकित्सा किंवा अभ्यास न करता. हे लक्षात घ्या की हे स्वप्न भारतीय जनता पक्षाने दाखवलेले स्वप्न नव्हते. भाजप सत्तेत येण्यापूर्वीच ते इथल्या राज्यकर्त्यांना पडायला लागलेले होते.

***अश्रफ :*** कदाचित त्यामळेच भाजपला सत्तेत येता आले असावे.

***नंदी*** : अगदी बरोबर! शहरी-औद्योगिक स्वप्न निर्दयपणे साकार करण्याची क्षमता भाजपत अधिक प्रमाणात आहे. किंवा त्यांना तसे भासवता तरी येते. परत एकदा सांगतो. सर्व तथाकथित ध्येयवादी विकसनशील देश याच एका ध्येयामागे हात धऊन लागलेले आहेत. सिंगापरचे प्रथम पंतप्रधान ली कआन य हे ह्या सर्वांचेच हीरो आहेत. ते इतके लोकप्रिय आहेत की ते शेवटचे 'हकमशहा विकासपरुष' होते असे विधान मी तरी करणार नाही. आता या पर्व-आशियाई वाघांनाच बघा. ते नसतेच वाघ नाहीत. तर मानवी रक्ताला चटावलेले वाघ आहेत. सर्वांचा कार्यकाळ हा हकमशाही पद्धतीने चालणारा आहे. नजरेत भरेल असा विकास करायचा असेल तर त्यासाठी हुकुमशहाच हवा अशी सर्वांची धारणा बनत चालली आहे.

***अश्रफ :*** भारत त्याच दिशेने जात आहे का?

***नंदी*** : भारतात ह्याची सरुवात इंदिरा गांधींच्या काळात. 70 च्या दशकातच झाली. ती झाली अनाहतपणे. पण आज आपण ठरवन हकमशहांना जन्म देत आहोत. सी. एन. अण्णादराई (द्रविड चळवळीचे उद्गाते आणि तमिळनाडचे मख्यमंत्री) यांनी जेव्हा असे जाहीर केले की तमिळनाडला भारतापासन विभक्त व्हायचे आहे. तेव्हा कणीही त्यांना देशद्रोही ठरवले नाही की संसदेत त्यांच्या पक्षावर निशाणा साधला नाही. भाजपचा पर्वावतार असलेल्या जनसंघानेसद्धा असे काही केले नाही. रागावलेली माणसे असे काही बोल शकतात हे सर्वांनीच समजन घेतले. इंदिरा गांधींनीही समजन घेतले. लालडेंगा यांनी तर राज्यसत्तेविरूद्ध बंडाचा झेंडा उभारला होता. स्वतःला बंडखोर सैन्याचा जनरल म्हणवलं होतं. इंदिरा गांधींनी त्यांच्यासोबत करार केला. मिझोरमचे मख्यमंत्री असताना लालडेंगा मरण पावले. त्यांचा अंत्यसंस्कार राजकीय इतमामाने केला गेला. ते शेवटी देशभक्त ठरले.

आज अशा वेगळया वाटा चोखाळण्याच्या सर्व शक्यता मावळल्या आहेत. कारण तम्ही ठरलेला मार्ग सोडन भरकटलात तर त्याचा राजकीय फायदा घ्यायला कणी तरी तत्परच असेल. म्हणजे द:ख फक्त आपल्या स्वप्नाचे अवकाश हरवल्याचेच नाही. तर आपला राजकीय अवकाशसुद्धा संकुचित होत चालला आहे. ह्याचेदेखील आहे.

***अश्रफ :*** 2050 किंवा 2100 पर्यंत ते आणखी संकुचित होईल?

***नंदी*** : आता ह्याहन संकचित नाही होऊ शकणार.

***अश्रफ :*** आज जे घडते आहे त्याचे कारण आपल्याकडे पर्यायी दृष्टिकोन नाहीत हे असेल का?

***नंदी*** : होय. जे काही पर्याय आहेत ते दरच्या परिघावर अडकलेले आहेत. मेधा पाटकर. क्लॉड अल्वारीस किंवा वंदना शिवा स्वतःला पराभत मानत नाहीत. कारण त्यांची त्यांच्या स्वतःच्या दृष्टिकोनांवर ठाम निष्ठा आहे. पण सामान्य लोक त्यांच्याकडे बघताना त्यांना द्रष्टे वा राजकीय पर्याय म्हणन बघत नाहीत.

***अश्रफ :*** एकसारख्या साचेबद्ध दृष्टिकोनांची मीमांसा करत त्यातन थोडेफार काही बरे निपजतेय का हे शोधण्यापुरते उरलेले पर्याय - अशा काही परिस्थितीत आपण सापडलोय का?

***नंदी*** : पर्याय? मी तर म्हणेन की भारतातली सभ्य व्यक्ती एक पण्यशील आयष्य जगल्यावर मरण पावली तर तिला स्वर्गात जाण्याचा पर्यायसद्धा उरलेला नाही. तिला थेट न्ययॉर्कलाच जावं लागेल. इतके आपले अंतिम ध्येय सीमित आणि साचेबद्ध झाले. पर्यावरणाच्या प्रश्नावर आपण पर्वी चर्चा करू शकायचो. आज ती नाही करू शकत. आपली पहिली धरण परियोजना होती दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन. ज्याअंतर्गत आठ धरणे ठरली होती: पण त्यांतली चारच पर्ण झालीत. त्या धरणांचा जितका उपयोग झाला त्यापेक्षा अधिक या कॉर्पोरेशनवर खर्च होत आहे. बिहारमध्ये आधी पराचे प्रमाण 15 % इतके होते. धरणांमळे ते आता 30 टक्क्यांच्याही पढं गेले. पर्यावरणाची समज आपल्यात शतकानशतक रुजवली गेली होती. कणी त्यावर मद्दामहन चर्चा करीत नव्हते. परंत पर्यावरणाच्या नाशामळे होऊ शकणारे कोप. त्याबद्दलची भीती. एका जादई-मानवातीत रूपात त्याचे अस्तित्व आपल्याला संरक्षण देते - अशी भावना ह्या सर्व बाबी आपल्यावर पर्यावरणाचं नकसान करू नये हा संस्कार करीत होत्या. या सर्व गोष्टी आता केवळ अंधश्रद्धा म्हणून बाजूला सारल्या जात आहेत.

'पढची पिढी' ही संकल्पना तर जण संपल्यातच जमा आहे. अमेरिकन उद्दामी शहाणपण सांगते -- 'मी भविष्याचा विचार का करावा? भविष्याने मला काय दिले आहे? आपणही असाच विचार करू लागलो आहोत. प्रत्येक भारतीयाला आता स्वतः परते जगायचे आहे. आपली पेटोलियम उत्पादनांवर चालणारी वाहने कितीही प्रदषण करोत. आपल्याला काळजी नाही. वरची न्यायालये त्याबाबत काही ना काही भमिका घेताहेत. त्यांच्याकडे काही एक दृष्टी आहे असे म्हणता येईल. इतर सर्व केवळ नियम तोडून पळवाटा कशा काढायच्या याचाच विचार करण्यात गर्क आहेत.

***अश्रफ :*** महाकाय धरणांचा एक परिणाम म्हणजे आदिवासींचं विस्थापन. 2100 मध्ये भारतातले आदिवासी अमेरिकेतल्या मूलवासींप्रमाणे अल्पसंख्याक होतील असे तम्हाला वाटते का?

***नंदी :*** आपण त्याचीच वाट बघतोय. वास्तविक ज्या ज्या भागात त्यांची संख्या विरळ आहे. जसे नागालँड मिजोरम. त्या त्या भागात आपण त्यांना संपवतोच आहोत. एक ततीयांश आदिवासी जमाती या आता नावापरत्याच राहिल्या आहेत. त्या विखरल्या आहेत. किंवा व्यक्तींच्या रूपात दिसत आहेत. त्यांचे रूपांतर आता सर्वहारा वर्गात झाले आहे. अर्थात आदिवासींचे सर्वहाराकरणाचा कार्यक्रम प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या डाव्या पक्षांसह सर्व राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यात दाखल झालेला आहे. या पक्षांना आदिवासींना समान पातळीवर आणायचे आहे. त्यांचे वेगळे अस्तित्व मात्र मान्य करायचे नाही. हे पक्ष आदिवासींसाठी न्याय मागतात. पण आदिवासींची न्यायाची कल्पना काही वेगळी अस शकते हे त्यांच्या गावीही नाही.

ह्याचा परिणामस्वरूप अवतरली आहे नक्षलवादी चळवळ. पण दसरी नक्षलवादी चळवळची ही दसरी लाट ही पहिल्या लाटेप्रमाणे शहरी धाटणीची नाही. हे खरोखर आदिवासी युवकांचे बंड आहे, ज्यात काही शहरी लोकही सामील झाले आहेत.

***अश्रफ :*** 2100 पर्यंत भारत 'भारत' न रहता अमेरिका बनलेला असेल का?

***नंदी :*** 2100 पर्यंत भारत अमेरिकेतील गरिबांच्या झोपडपट्टीप्रमाणे झालेला असेल. त्यासाठीही आपल्याला आपले स्वातंत्र्य बऱ्यापैकी गमवावे लागेल.

***अश्रफ :*** म्हणजे?

***नंदी :*** आज विद्यापीठांमधूनसुद्धा तुम्ही काय बोलावे आणि काय बोलू नये यावर

निर्बंध आलेले आहेत. विकासवादाहून काही वेगळा दृष्टिकोन वृत्तपत्रीय स्तंभलेखनातन मांडणेही अगदी कठीण होऊन बसले आहे. अतिशय टोकाचे विभिन्न दृष्टिकोन मांडण्यासाठी भारत पर्वी प्रसिद्ध होता. मळात आपल्या परंपराच एकमेकांहन कितीतरी भिन्न होत्या. उदाहरणार्थ तमिळनाड आणि उत्तर बंगालात कोट्यवधी लोक रावणाला आपले दैवत मानतात व रामनवमीला सतक पाळतात. यात त्यांची काय चक ? श्रीलंकेत विभीषणाची पजा होते. हिमाचल प्रदेशात दुर्योधनाची देवळे आहेत. त्याने कणाच्याच भावना दखावत नाहीत. म्हणजे आपला एक धर्म असा नव्हताच. वेगवेगळया धार्मिक परंपरा होत्या. पण आज आपण प्रॉटेस्टंट ईसायांप्रमाणे म्हणू लागलो आहोत, 'चला धार्मिक होऊ यात!'.

***अश्रफ :*** मला तमच्या एका वाक्याची आठवण झाली- ' हिंदत्व हे हिंदवादा (hinduism) वरचे आक्रमण आहे ज्यांचा हिंदवाद नष्ट झाला आहे, त्यांच्यासाठी हिंदत्व उपयोगाचे आहे आणि हिंदत्वाच्या विजयामुळे हिंदुवादाचा पराजय होईल'. आपण त्या दिशेने चाललो आहोत का?

***नंदी*** : होय. जो हिंदवाद आपण आपल्या अवतीभवती बघतोय तो काही 2000 किंवा 4000 वर्ष जना नाही. हे फक्त 150 वर्षे जने प्रकरण आहे. हे शहरी भारतात ब्रिटिशांनी आणलेल्या नवराजकीय अर्थकारणामळे उदयाला आले. ह्या हिंदवादाचा संदर्भबिंद प्रॉटेस्टंट ईसाई पंथ हा होता, कॅथॉलिक पंथ नव्हे, जो अधिक उदार आहे. मी स्वतः प्रॉटेस्टंट असल्यामळे हे सांग शकतो. रा. स्व. संघाचे पहिल्या पिढीतले प्रचारक, जसे की संघाचे स्थापनाकार केशव हेडगेवार किंवा हिंद महासभेचे बी. एस. मंजे यांचे प्रेरणास्थान होते रामकृष्ण मिशन, जे स्वतः ईसाई धर्माने प्रभावित होते. रामकृष्ण मिशनचे संस्थापक विवेकानंद मात्र फार वेगळे होते. ते मस्लिमांकडे खलनायक म्हणन पाहत नव्हते.

***अश्रफ :*** आताच्या या नवीन हिंदत्ववादाचे लक्षण कोणते? एकारला धर्म?

***नंदी*** : एकदा का तम्ही राष्ट्रवादाचा(एक देश, एक धर्म, एक भाषा) स्वीकार केलात की मग धर्माबद्दल काही चर्चाच नको! अर्नेस्ट गेलनर म्हणतो तम्हाला राष्ट्रवादावरचे विवेचन करण्याची गरजच काय? कारण सर्व प्रकारचा राष्ट्रवाद हा सारखाच असतो. सावरकरांनी हे ओळखले. त्यांची धर्मावर श्रद्धा नव्हतीच. त्यांनी स्वतःच्या पत्नीचे हिंद धार्मिक विधी प्रमाणे अंत्यसंस्कार करण्याचे नाकारले, गोळवलकर यांची त्यांच्या धार्मिक कर्मकांडांच्या आवडीबद्दल खिल्ली

उडवली. सावरकर हे नव्या उदयोन्मुख राष्ट्राचे खऱ्या अर्थाने पिता ठरणार. गांधी ठरणार सावत्र पिता !

***अश्रफ :*** पुन्हा आपल्या निबंधाकडे वळतो. आपणाला वाटते की हिंदुत्वाच्या विरोधात (पारंपारिक) हिंदुवाद लढेल?

***नंदी*** : होय. हिंदुवादात एक सूक्ष्म शक्ती राहिलेली आहे जी नेहमी असल्या उपऱ्या लादण्याला विरोध करते. वरून काही लादायला जाल, तर ही संस्कृती त्याला रिचवते, पचवते, स्वतःत समावून घेते, पण त्यासमोर वाकत नाही. संस्कृती ही एखाद्या राज्याला शांतपणे गडप करू शकते. शिवाय सिंधू संस्कृती ही (युरोपातून आयात केलेल्या , केवळ ३०० वर्षे जुन्या) भारतीय राष्ट्र-राज्य संकल्पनेहून भिन्न आहे हे लक्षात असू द्यावे.

मला हा विश्वास वाटतो की भारताला एकरूप राष्ट्राच्या दिशेने नेणे केवळ अशक्य आहे. टागोर म्हणाले होते की भारतात राष्ट्रच नाही. म्हणून त्यांनी इंग्रजी 'नेशन' शब्द बंगाली वर्णात लिहिला. परंतु त्यांनी देशप्रेम या अर्थाचे १२ ते १५ शब्द बंगालीत लिहिले. भारतीय लोक देशप्रेमी आहेत, परंतु देशप्रेम आणि राष्ट्रवाद या दोन शब्दांच्या अर्थांची नेहमी गल्लत केली जाते. राष्ट्र एकरूपता मागते, व्यक्तिगत चेहरामोहरा राष्ट्र-राज्यात विलीन करायला लावते, व्यक्तीच्या समोर मग फक्त राज्यसंस्था असते. त्यांच्या अधेमध्ये काहीही नसते - ना समाज, ना धर्म, ना पंथ, न जात, ना अधलीमधली काही रचना. इथे फक्त एक व्यक्ती असते आणि एक आदर्श राष्ट्र-राज्य. भारतीय लोक ह्याचा स्वीकार एका मर्यादेबाहेर करतील असे मला वाटत नाही.

***अश्रफ :*** तेव्हा या राष्ट्रसंकल्पनेला हिंदुवादातूनच आव्हान उभे राहील असे आपणास वाटते का?

***नंदी*** : होय.

***अश्रफ :*** जात ही हिंदुवादाच्या वतीने लढेल असे वाटते?

***नंदी*** : जात ही संस्था खूप बदनाम आहे. तिचे इतके राजकीयीकरण झालेले आहे की आज जातीच्या राजकारणावर होणाऱ्या परिणामांपेक्षा राजकारणाचे जातिसंस्थेवर पडणारे प्रभाव याबद्दल बोलायला हवे. मात्र जातिव्यवस्था हिंदुत्वाविरुद्ध उभी आहे हे नक्की. म्हणून तर मग हिंदुत्ववादी हे जातिव्यवस्थेच्याही विरोधात असतात. मात्र एक व्यापक दृष्टिकोन, पर्यायी दृष्टिकोन हा विभिन्न पंथ आणि श्रद्धांमधल्या वैविध्यातूनच येईल.

***अश्रफ :*** इतक्यात तुम्हाला असे काही संकेत मिळत आहेत का?

***नंदी*** : प्रत्येक श्रद्धाळू भारतीय हे त्याचे संकेतचिह्न आहे. हिंदुत्व हे हिंदूंच्या अनेक मूळ श्रद्धाप्रवाहांच्या आड येत आहे. इथे प्रत्येकाच्या काही खाजगी देव-देवता आहेत, त्याच्या काही कौटुंबिक देव-देवता आहेत, काही त्याच्या समाजाच्या देव-देवता आहेत, त्याच्या गावच्या, त्याच्या पंथाच्या आणखी काही वेगळ्या देव-देवता आहेत. शिवाय प्रत्येकाच्या काही वैयक्तिक प्राथमिकता आहेत. काही देव-देवतांना पुजायचे नसले तरी दुखवायचे पण नाही. त्या देवांमध्ये त्याचे स्वतःचे प्रतिबिंब आहे की नाही, त्याची श्रद्धा आहे की नाही, हा मुद्दा इथे गैरलागू आहे. उदाहरणार्थ हिंदूंना दर्ग्यात किंवा (अमृतसरच्या) सुवर्णमंदिरात जायला आवडते. हिंदुत्वाला हे थांबवता येणार नाही. हा अगदी वेगळाच खेळ आहे.

***अश्रफ :*** जर गांधी २०५० किंवा २१०० मध्ये परत आले तर?

***नंदी*** : तत्त्वज्ञानातील मुख्य प्रवाह कधी सहजासहजी मरत नाहीत, ते स्वतःहून कुठे कुठे प्रगट होत राहतात. दुसऱ्या महायुद्धानंतर जगात जे महान नेते निपजले - जसे मार्टिन ल्युथर किंग, नेल्सन मंडेला, ऑँग सॅन स्यू की, दलाई लामा - हे सर्व गांधींच्या प्रतिमेच्या कमीअधिक जवळ जाणारे होते/आहेत. या नेत्यांनी गांधी अभ्यासून अमुक एक भूमिका घेतली असे नाही. उदा.; पोलंडच्या ट्रेड युनियनचा नेता लेश वालेसा ह्याला स्थानिक लोक 'आमचा गांधी' म्हणतात. हा गांधीवादी धागा तुम्ही मिटवू शकत नाही. अल्पमतातील विचारप्रवाह म्हणून तो पढे चालत राहणार. कदाचित एखाद्या उत्पातातून जन्मेल...

***अश्रफ :*** गांधी?

***नंदी*** : अगदी १००% गांधी नाही. पण गांधींची असंख्य रूपे. तेव्हा कुठे ते जन-आंदोलन होईल. त्यासाठी तुम्हाला 2100 पर्यंत वाटही बघावी लागणार नाही. त्या आधीच हे होईल. कारण आज आपण तापमानबदलाच्या शेवटच्या टप्प्यात आहोत. मानवी हव्यास आणि लोभीपणाला वेसण घालण्याची वेळ आता येऊन ठेपलेली आहे. मी एकदा बाजारात असलेल्या लिपस्टिकच्या रंगांच्या छटा मोजत बसलो होतो. 1200 च्या नंतर मी मोजणे थांबविले. पुढचे मोजूच शकलो नाही. आपल्या डोळ्यांचा retina इतक्या सूक्ष्म छटांमध्ये फरक करू शकणार नाही. तरीही आपण पुढचे अनेक शेड्स बनवतोच आहोत.

असे असले तरी पूर्वीच्या कृषिव्यवस्थेकडे आपण परत जाऊ शकू असे व्यक्तिशः मला तरी वाटत नाही. शहरी-औद्योगिक दृष्टिकोणाच्या सर्व सीमा

आपण पार केल्या आहेत असे मला वाटते. हे कळूनही आपण उलट्या दिशेने जाऊ शकत नाही, इतके हे वाईट आहे. जेव्हा संसाधनांचा प्रचंड तुटवडा भासेल तेव्हा, किमान तुमच्या नातू-पणतूच्या पिढीला जगण्यापुरते तरी ते पुरावे इतपत तरी निर्बंध आपल्याला घालावे लागतील. त्या पुढच्या पिढ्यांचा विचारच सोडा.

***अश्रफ :*** 2100 मध्ये आंबेडकर कसे असतील?

***नंदी :*** आंबेडकरांनी गांधीवादी भूतकाळाशी तादात्म्य पावणारा धर्म स्वीकारला. पण दुर्दैवाने ते अतिशय आधुनिक होते. त्यांनाही शहरी-औद्योगिक व्यवस्थाच अभिप्रेत होती. त्यापलीकडे तेही बघत नव्हतेच.

***अश्रफ :*** तुम्ही एक निबंध आनंदावरही लिहिला. 2050 पर्यंत भारतीय आनंदी असतील?

***नंदी :*** आपण दुःखी असू नये अशीच मागणी त्यांच्याकडून केली जाईल.

***अश्रफ :*** तर मग 2100 पर्यंत भारत किती आनंदी राहील?

***नंदी :*** सध्या तरी भारतीय बऱ्यापैकी आनंदी आहेत. गरीब देश सहसा तसे असतातच. बांगलादेश आनंदी लोकांच्या यादीत बऱ्यापैकी वर होता, नायजेरियादेखील. भारतीयही बऱ्यापैकी वर आहेत. यादीतले हे स्थान इतक्यात तरी बदलायचे नाही. त्यामुळे 'तुम्ही आनंदी असा' अशी सार्वजनिक मागणीच केली जाईल. तुम्ही दुःखी असाल तर तुम्ही देशद्रोही ठरवले जाल. तुम्ही दुःखी असाल तर सोविएत युनियनच्या प्रमाणे तुम्ही वर्गशत्रू ठरवले जाल. तिथे दुःखी लोकांना मनोविकारतज्ज्ञाकडे पाठवले जाई.

***अश्रफ :*** आपणही त्याच दिशेने जात आहोत?

***नंदी :*** भारत त्या दिशेने ढकलला जाण्याची दाट आशंका आहे.

(मूळ मुलाखत ‘सा. आउटलूक’च्या 31 ऑक्टो. 2016 च्या अंकात प्रकाशित झालेली आहे.)

ईमेल: prajwalat2@rediffmail.com

# काश्मीरचे वर्तमान : 1

*सुरेश खैरनार*

*काश्मीर, हिंसा, काश्मिरी पंडित, मुस्लिमप्रश्न*

---------------------------------------------------------------------------

भारत-पाक फाळणीला आता 70 वर्षे होतील. पण काश्मीरमधील पेचप्रसंगाने ही जखम अजूनही भळभळती ठेवली आहे. गेले सहा महिने तर तेथे कर्फ्युच लागलेला होता. लष्करी बळावर आपण काश्मीर भारतात भौगोलिक दृष्ट्या राखू शकू. पण त्यातून उद्भवणारे राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक प्रश्न आपली पाठ सोडणार नाहीत. थेट काश्मीरला जाऊन तेथील विविध जनसमुहांशी थेट संवाद करून तेथील परिस्थितीचा एका पुरोगामी कार्यकर्त्याच्या दृष्टीने धांडोळा घेणाऱ्या रिपोर्ताजचा हा पूर्वार्ध.

---------------------------------------------------------------------------

**1 ऑक्टोबर 2016**

राष्ट्र सेवा दलाच्या ट्रस्टीमंडळाने गुजरातमधील उना व काश्मिरमधील सध्याच्या परिस्थितीचे अवलोकन करण्यासाठी मला पाठविण्याचा निर्णय घेतला म्हणून मी 1 ऑक्टोबर रोजी नागपूर-दिल्ली-जम्मू विमानाने सकाळी 11 वाजेपर्यंत जम्मूला पोहोचलो. उतरल्याबरोबर माझा मोबाईल बंद झाला. काश्मिरवरची भारत सरकारची पहिली उपाययोजना! सगळी संपर्काची साधने सरकारच्या मर्जीने बंद! गंमत म्हणजे तिथे आणीबाणी लागू केलेली नाही. मी आणीबाणीचा काळ बघितल्यामुळे मला हे अघोषित सेन्सॉरशिपचे रूपच वाटले.

जम्मू विमानतळावरून एक टॅक्सी बोलावली होती. तिने सरळ जम्मू-श्रीनगर हायवेवरील जागती नावाच्या काश्मिरी पंडितांच्या कॉलनीत गेलो. तेथे सायंकाळपर्यंत पंडितांचे नेते त्रिलोकनाथ पंडित (वय वर्षे 88) व कॉलनीतील इतर लोकांशी बोललो. 2006 मध्येही मी तिथे गेलो होतो. तेव्हा हे सगळेजण दहा बाय दहाच्या पत्र्याच्या शेडमध्ये अत्यंत दाटीवाटीने राहत असलेले मी पाहिले होते. यावेळी एकदम पुण्या-मुंबईतील बऱ्या हौसिंग सोसायटींच्या धर्तीवर एकसारख्या इमारतींची रचना, मध्यभागी मोकळ्या जागेत बाग. बागेत मुलांना खेळण्यासाठी सी-सॉ, घसरगुंडी आणि इतर प्रकारही दिसले. त्रिलोकीनाथ पंडितांच्या घराच्या भिंतीवर 2007 साली त्यावेळचे पंतप्रधान

मनमोहन सिंहांनी उद्घाटन केलेले फोटोसुद्धा पाहिले. माझ्या मागील भेटीतील पाहिलेल्या नरकापेक्षा आताची वसाहत बरीच चांगली, ऐसपैस बांधलेली दिसली. कॉलनीला शॉपिंग कॉम्प्लेक्स, 10 खाटांचे हॉस्पिटल इ. सोयी पाहून मन निवले. आता ही मंडळी काश्मिरात परत न येण्याचा धोकाही मला त्यात दिसला. कारण 2006 साली मी त्यांना काश्मिरात गेल्यावर हुरियतच्या नेत्यांना काश्मिरचे काहीही होवो पण काश्मिरी पंडितांशिवाय सब झुट! म्हणून हुरियतने काश्मिरी पंडितांना परत आणण्याची आपल्यापरीने सुरुवात केल्याचे मी ऐकले होते; पण आता ही कॉलनी पाहून माझी उरलीसुरली आशाही मावळली. त्रिलोकीनाथांनी समोरच्या फ्लॅटमधील उडशीच्या अंजली रैनांना चहा करण्याची आज्ञा केली. त्या चहा घेऊन आल्यावर बसल्या बसल्या म्हणाल्या, "आम्ही मुसलमानांना म्लेंच्छ (नीच, अस्पृश्य) समजतो, म्हणून त्यांना आमच्याकडे मुक्त प्रवेश नाही, आम्ही त्यांचे भांडे वेगळे ठेवतो". मनातल्या मनात म्हटले- कुठले हे लोक काश्मिरला येतात?' अन् बाई चक्क बोलल्या, ''मेरी बेटी पुणे हिंजवडी के आय.टी. में बडी पोस्ट पे है. हमने वहाँ फ्लैट भी ले लिया है और मैं भी वहाँ रहने जा रही हूँ.'' मी तुम्हाला काश्मिरला घ्यायला आलो हे बोलायचीही सोय नव्हती. म्हणाली, "आम्ही पंडित पुऱ्या दुनियेत 60 लाख आहोत. इथे जम्मू परिसरातील आमचा कॅम्प जागती बाजूचा नगरौटा व जम्मूच्या वरच्या अंगाला मिस्त्रीवालामध्ये आम्ही एकूण 3 लाख आहोत. उरलेले 57 लाख देश-विदेशात फैलावले आहेत आणि आता त्यांपैकी कुणाचीही इकडे यायची इच्छा नाही". संघ परिवार ऊरबडवेगिरी करून काश्मिरी पंडित, काश्मिरी पंडितचा हेका धरून हिंदूंच्या भावना भडकावण्याचा अव्याहतपणे उद्योग करतात अन् हे पंडित आपल्या करियरसाठी वाट्टेल तेथे (काश्मिर सोडून) जायला निघालेले पाहून तर मला वाटून गेले काश्मिरी पंडितांची समस्या येत्या 10 वर्षांत संपलेली असेल; कारण अंजली म्हणाली, "जागती कॅम्पमधील पाचशेच्यावर मुलेमुली इंजिनिअरींग, एम.बी.ए., मेडिकल इ. उच्च विद्यांमध्ये पारंगत होऊन देश विदेशाबाहेर चांगल्या पगारांवर कामाला लागलेले आहेत. 100% साक्षरता; यात मुलेमुली सारखीच. पंडितांची आधीचीपण स्थिती चांगलीच होती. आतातर ते स्ट्रगल फॉर रेझिटन्सच्या भावनेने खूपच मेहनतीने मन लावून शिकत असून आपल्या मुलांना शिकवण्यासाठी सर्वस्व पणाला लावत आहेत!"

तेथून 8-10 कि.मी.वरील नगरौटा कॅम्पला गेलो. नगरौटाला आर्मीचे

खूपच मोठे सेंटर असून त्याला लागूनच असलेला पंडितांचा जागतीसारखाच मल्टीस्टोरी कॉम्प्लेक्स मला पाहायला मिळाला. मी तिथे पूर्वी येऊन गेल्याचे त्यांना आठवले, म्हणून त्यांच्या ऑफिसात सगळे पदाधिकारी जमा झाले; पण सगळ्यांचा एकच सूर – "खैरनार साहब आप और कुछ मत कीजियें. हमें पर पर्सन 2500 भत्ता महिने का मिलता है. 9 किलो अनाज मिलता है और पर फॅमिली 10,000 रुपये महिने के मिलते हैं. इन्हे बढाने का काम करो." मी त्यांना म्हणालो की, मी यांतील एकही काम करू शकणार नाही; पण मी तुम्हाला मागे काश्मीर घाटीमध्ये घेऊन जाण्याचे जे बोललो होतो ते प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करीन. यावर सर्वांनी एका एका आवाजात सांगितले की आम्हाला घरीच नेणार असाल तर आमची स्वतंत्र कॉलनी सुरक्षेच्या कवचात करा. मी म्हटले, "आपको अपने पुश्तैनी घर ले जाने का मेरा इरादा है," जे त्यांनी साफ नाकारले. मी त्यांना म्हणालो, "तुमच्या सुरक्षेसाठी वेगळी कॉलनी करणे हे सगळ्याच अर्थाने चुकीचे आहे. त्याने उलट तुम्ही अलगथलग पडून जाल व असुरक्षतेची तलवार आयुष्यभर तुमच्या डोक्यावर टांगती राहील", तर ते म्हणाले, "मग आम्ही इथे काय वाईट आहोत? उलट आमची मुलेमुली शिकूनसवरून देश-दुनियेत जात आहेत. हम भी यहाँ कहाँ रहनेवाले हैं? चले जायेंगे बच्चों के साथ इधर उधर."

1 ऑक्टोबरचा आख्खा दिवस दोन कॅम्प्समध्येच गेला. रात्री हॉटेलच्या खोलीवर मिश्र भावनांचा कल्लोळ घेऊन आलो. त्यांची सुस्थितीतील घरे पूर्वीच्या खुराड्यांपेक्षा बरी होती व त्यामुळेच की काय दहा वर्षांत त्यांच्यातील आत्मविश्वास व जिद्द, मुलांच्या शिक्षणासाठी एकजात त्यांचे चाललेले प्रयत्न पाहून बरेही वाटले. पण गेल्या भेटीत काश्मिरी पंडितांचे विविध नेते मला सांगत होते की –काश्मिरीयत के असली प्रतिनिधी हम ही हैं. हमारी ही संस्कृती 5000 साल पुरानी है, इसलिये काश्मिर पे हमारा हक हर तरह से जायज है. इ.इ. यावेळी त्यांच्यापैकी एकानेही माझ्या फोनला, मेलला उत्तर दिलेले नाही. कदाचित त्याचे कारण हेच तर नसेल?

**2 ऑक्टोबर, 2016**

गांधी जयंती. मी काश्मिरी पंडितांच्या तिसऱ्या कॅम्पला - मिस्त्रीवाला - जायचा विचार केला, तर काश्मिर टाईम्सचे संपादक प्रबोध जमवाल म्हणाले, "कल आप दोनो कॅम्पो में हो आए, आज आप तिसरे कॅम्प में क्या नया पाओगे?

यहाँ से 40 कि.मी. पर बॉर्डर है और उरी के घटना के बाद बॉर्डर के गांवो का क्या हाल है यह आपको देखना चाहिए.” म्हणून मी रणवीरसिंह पूरा या सीमेपलिकडील भागात गेलो. जम्मूपासून पंजाबच्या दिशेने 40 कि.मी. संपूर्ण बासमतीचे कापणीला आलेले पाच-साडेपाच फूट उंचीचे भाताचे पीक पाहून मी तर हरखून गेलो. भारताच्या सगळ्याच प्रदेशांमध्ये जायचा योग आलेला. स्वतः शेतकरी कुटुंबातील जन्मलेला, म्हणून इतके जबरदस्त पीक पाहून राहवले नाही. मी गाडीतून उतरून शेतात घुसलो व फोटो काढायचा प्रयत्न केला पण मी शेतात दिसत नव्हतो. शेवटी बांधावर चढून फोटो काढला. ही शेती जम्मूनंतर सुरू होते ते थेट बॉर्डरच्या पलीकडेपण! मध्ये फक्त तारांचे कुंपण. पलीकडे सियालकोट जिल्ह्याचे शेतही बासमतीने डौलत असलेले दिसत होते! अशा तऱ्हेने सीमांचे प्रदेश पाहिले म्हणजे मला नेहमी प्रश्न पडतो की, कोणा मूर्खाच्या हाती कागद व पेन्सील आली व त्याने ह्या रेघोट्या ओढल्या? भारत-पाकिस्तान, इराण-इराक इ.इ. माती, पाणी, हवा, पक्षी, जनावरे व सर्वांत महत्त्वाचे म्हणजे माणसे व बाया सगळे सारखेच! सीमांचा खेळ आतातरी तथाकथित सुधारलेल्या, स्वतःला सभ्य म्हणवणाऱ्यांनी बंद करायला हरकत नाही. अन्यथा माणूस अजूनही सुधारला नाही असेच म्हणावे लागेल.

रणवीरसिंहपुरापासून 10-12 कि.मी वरील एकदम सीमेवरचे अब्दुलीनिया गाव गाठले. इनमीन शे-सव्वाशे घरे, 3 बंकर, मेजॉरिटी जाट शेतकरी, सगळी पक्की घरे, घरी दुधाची रेलचेल अन् बासमतीची शेती. सगळे गाव समृद्ध वाटले; पण उरीनंतर गावांवर युद्धाची अवकळा पसरलेली. गावात फिरता फिरता सायंकाळ झाली तो अजानीचे सूर आले. अजान येत आहे ते गाव कुठले? तर नंदपूर. मी विचारले, “हे भारतातील का?” म्हणाले, “नाही. पाकिस्तानातील सियालकोट जिल्ह्यातील.”

थोड्या वेळाने अजून वेगळ्या अजानीचे सूर आले. म्हटले, ‘हे कोणते गाव?’ तर म्हणाले, ‘कुंजापूर!’

मी हटकून विचारले, “गावांची नावे अजून नंदपूर, कुंजापूरच आहेत?” तर ठासून म्हणाले, “हो’ आणि आमचे गाव अब्दुलिनिया नाही का?” अब्दुलिनिया तीन बाजूंनी पाकिस्तानी सीमांनी वेढलेले आहे. फक्त एका बाजूने रणवीरसिंहपुरासाठी जो रोड जातो तोच काय तो ॲक्सेस. आमच्या देखत सूर्य मावळतीला लागला होता व गावात लगबग सुरू झाली. म्हटले, “काय झाले?”

म्हणाले, "आर्मीचे ट्रक व बसेस सायंकाळी येऊन समस्त गावाला घेऊन जातात व रात्रभर रणवीरसिंहपूराच्या आयटीआय व खुल्या स्टेडिअममध्ये ठेवून सकाळी परत आणून पोहोचवतात. गुरे, ढोरे सगळे सामान सोडून." हा रोजचा प्रकार.. आपण भारताच्या मध्यवर्ती राहणारे लोक 62, 65, 71 ची युद्धे वीररस्य कथा म्हणून वाचत, पाहत, ऐकत आलोत. 400 वर्षांपूर्वी मावळे, शिवाजी व थोडेफार पेशव्यांचे युद्धाचे प्रसंग सोडले तर आपल्या वाट्याला हा अनुभव कधी येतो का? मला हा प्रश्न सीमेवर उभा असताना वारंवार पडत होता. काही माणसे किती असुरक्षित व आपण किती सुरक्षित याचे वैषम्य वाटत होते व युद्धस्य कथा रम्या ह्या प्रकाराचीही लाज वाटत होती. कारण युद्धाची प्रत्यक्ष झळ न लागणाऱ्या समाजाला ते करमणुकीचे साधन वाटते. प्रत्यक्ष युद्धसीमेवर लढणारा सैनिक असो वा तेथील रहिवासी यांच्यासाठी 'आपुलें मरण पाहिलें मीं डोळां' या म्हणीचे प्रत्यंतर क्षणोक्षणी येत असते. म्हणून सत्तेच्या सोंगट्या खेळणाऱ्या जगातील समस्त सत्ताधिशांना माझे या निमित्ताने आवाहन आहे की, 'आयजीच्या जीवावर बायजी उदार'वाला हा मामला बंद करा. तुमच्या खेळापायी लाखो लोकांचे प्राण, जीवन धुळीला मिळते, त्याचे काय? आणि आपण खरेच सभ्य झालो असे वाटत असेल तर यापुढे युद्धखोरीचे खेळ बंद करून आपण शांततेची कास धरूया. युद्ध ही रानटीपणाची खूण आहे. माणूस ते जेवढ्या लवकर थांबवेल तेवढे समस्त मानवाचे कल्याण होईल. भारत व पाकिस्तान एकमेकांच्या शत्रुत्वापोटी जगाच्या संरक्षणखर्चाच्या 3/4 बजेट खर्च करत आहेत. . दोघांच्या प्राथमिक गरजा अजून पूर्ण व्हायच्या आहेत. बकालपणा, दारिद्र्य, भूकबळी, अनारोग्य इ. मूलभूत समस्यांच्या सोडवणुकीसाठी दोघांच्या बजेटमध्ये नाममात्र व्यवस्था आहे. संरक्षणावरचा खर्च कमी केला तर दोन्ही राष्ट्रांचे प्राथमिक प्रश्न सुटायला मदत होईल व त्यामुळे दोन्ही देशांची सर्वार्थाने भरभराट होईल. पण ह्यासाठी दोन्ही देशांधील सभ्य समाजानेच पुढाकार घेऊन आपल्या राज्यकर्त्यांना वठणीवर आणण्याचे काम अग्रक्रमाने करायला हवे. दोन्हीकडच्या सुजाण लोकांचा या बाबतीत सहभाग घेऊन आपण हा पागलपणा थांबवून आपापले खरे प्रश्न सोडवून गुण्यागोविंदाने नांदलो तरच आपल्या येणाऱ्या पिढीला आपण शांत, सुस्थितीतील भविष्य देऊ शकू. अन्यथा आपली भावी पिढी आपल्याला जाब विचारू शकते असे या सीमेवरच्या आजच्या प्रवासातून माझ्या मनात येऊन गेले.

**3 ऑक्टोबर 2016**

जम्मूहून सकाळी 10च्या विमानाने श्रीनगरला जाण्यासाठी विमानतळावर आलो असता तपासणीचा नवाच अनुभव वाट्याला आला. सहा जागी स्कॅनिंग प्लस कैक जागी बॅगा उघडून सर्व सामान बाहेर काढून दाखवण्याचा प्राणायाम. हे कमी होते की काय म्हणून चक्क विमानात लगेजमध्ये जाणाऱ्या बॅगला 'ही माझी बॅग' म्हणून विमानाजवळ जाऊन बोर्डिंग पासवर टिकमार्क करून आल्यावरच बॅग विमानाच्या आत फेकतात. 15-20 मिनिटांतच श्रीनगर आले. मला माझे पॅलेस्टाईन यात्रेतील मित्र मोहम्मद याकुब दार घ्यायला आले होते. ते मला विमानतळावरून थेट त्यांच्या एका नातेवाईकाच्या लग्नसमारंभात घेऊन गेले. अर्ध्या तासातच आम्ही गुलशन नावाच्या श्रीनगरमधल्या कॉलनीत पोहोचलो. 9 जुलैपासून बंद, कर्फ्यूत असलेले काश्मिर, तुरळक वाहतूक. सगळ्यात जास्त वाहतूक होती सुरक्षादलांची. सामान्य लोक अगदीच नाईलाजाने, जावेच लागते म्हणून भीत-भीत वावरताना दिसत होते. भीतीचे सावट लग्नघरावरही दिसले. इनमीन 15-20 लोक (बाया माणसे, मुले-मुली धरून) होते. गाजावाजा नाही, लगीनघाईत असलेली धांदल, गोंधळ काही नाही. स्मशानशांतता वाटावी असा माहोल. सगळे चूपचाप! मला एका खोलीत नेल्यावर पाचेक मिनिटांतच लग्नातील बहुसंख्य माणसे माझ्या खोलीत आली. चारी बाजूंना खाली दाटीवाटीने बसून माझ्याशी बोलू लागली. त्यात निम्म्यापेक्षा जास्त बायकाच होत्या व एकीनेही बुरखा घेतला नव्हता. चक्क दोन-अडीच तास आमची लग्नापासून ते काश्मिरच्या आंदोलनापर्यंत अनेक प्रश्नांवर मनमोकळी चर्चा झाली. या चर्चेत बायकांचा सहभाग विलक्षण प्रभावकारी, लक्षणीय होता. सर्वच बायका सुशिक्षित असून त्यांना सर्व प्रश्नांची विलक्षण समज होती. हा तेथील चळवळीचा परिणाम की एकूणच काश्मिरची खासियत असा मला प्रश्न पडला. शादीची दावत जरी छोटेखानी असली तरी काश्मिरीयतचा परिचय होण्यात यजमानांनी कसलीच कसर ठेवली नव्हती. विलक्षण उदार, आत्मीयतेने ओतप्रोत, अत्यंत मोकळेढाकळे असे काम वाटले. आपल्या घरांमध्ये आपण इतक्या नवख्या व्यक्तीला एवढ्या कमी वेळात आपल्यात सामील करून घेतो का? मला तरी पुन्हा पुन्हा हाच प्रश्न पडला.

(अपूर्ण)

ईमेल: sureshkhairnar59@gmail.com

# लॉन्सचा छोटासा इतिहास

## *युवल नोह हरारी (अनुवाद : धनंजय मुळी)*

*ज्ञानाचा विरोधाभास*

---

काही व्यवस्था किंवा रचना गुंतागुंतीच्या असतात. त्या व्यवस्थांच्या भविष्यातील स्थितीबद्दल आपण काही अंदाज (predictions) बांधतो. काही व्यवस्थांवरती आपण करत असलेल्या अंदाजांचा किंवा भाकितांचा अजिबात परिणाम होत नाही. उदाहरणार्थ, हवामान ही व्यवस्था. उद्याच्या हवामानाचे भाकीत केल्याने हवामान बदलते असे होत नाही. मानवी व्यवस्था मात्र गुंतागुंतीच्या असतात आणि त्या व्यवस्थेसंबंधी केलेल्या भाकितांचा त्या व्यवस्थेवरती परिणाम होतो. जेवढी भाकिते जास्त चांगली, तेवढी ती व्यवस्था भाकितांना जास्त प्रतिसाद देते. त्यामुळे मानवी व्यवस्था समजून घेण्यासाठी आपण जसजशी जास्त माहिती गोळा करत आहोत, ती माहिती 'प्रोसेस' करण्यासाठी आपली संगणन-क्षमता वाढवत आहोत, तसतशा व्यवस्थेतील घटना अधिकाधिक अकल्पनीय आणि अनाकलनीय होत जात आहेत असा विरोधाभास दिसतो. जेवढी आपल्याला जास्त माहिती होते आहे, तेवढी आपली अचूक भाकिते करण्याची क्षमता कमी होत जात आहे. कल्पना करा, उदाहरणार्थ, भविष्यात एके दिवशी आपल्याला अर्थव्यवस्थांचे मूलभूत नियम माहीत झाले आहेत. हे घडताच बँका, शासन, गुंतवणूकदार आणि ग्राहक हे सारे नवीन ज्ञान वापरून नवे मार्ग शोधून काढतील आणि त्यांच्या स्पर्धकांपेक्षा पुढे राहण्याचा प्रयत्न करतील. ज्ञान वापरून नवीन मार्ग सुचले किंवा शोधले नाहीत तर ज्ञानाचा उपयोगच काय? आणि एकदा का लोकांनी आपले वर्तन बदलले की त्या अर्थव्यवस्थाही बदलतील. अर्थव्यवस्थाच बदलल्यामुळे आपले अर्थशास्त्रीय आकलनही कालबाह्य होईल. अर्थव्यवस्था भूतकाळात कशी काम करत होती हे कदाचित आपल्याला समजू शकेल पण अर्थव्यवस्थांचा वर्तमानकाळ आता आपल्याला समजू शकत नाही आणि भविष्यकाळ तर नाहीच नाही.

हे काही काल्पनिक उदाहरण नाही. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावरती

कार्ल मार्क्सने अतिशय हुशारीने काही अर्थशास्त्रीय सिद्धान्त शोधून काढले. या सिद्धान्तावर आधारित कष्टकरी वर्ग (proletariat) आणि भांडवलदार यांच्यातील संघर्ष वाढत जाऊन आणि हिंसक होत होऊन कष्टकरी वर्गाचा विजय होईल आणि भांडवलशाही व्यवस्था मोडून पडेल असे भाकीत त्याने केले. मार्क्सला खात्री होती की औद्योगिक क्रांतीच्या अग्रभागी असलेल्या ब्रिटन, फ्रान्स, आणि अमेरिका यांसारख्या देशांत क्रांतीची सुरुवात होईल आणि ती जगभर पसरत जाईल.

भांडवलदारही आपले पुस्तक वाचू शकतात याचा मार्क्सला बहुधा विसर पडला. सुरुवातीला अगदी मूठभर लोकांनी मार्क्स काय म्हणतो आहे याकडे लक्ष दिले. या उगवत्या समाजवादी नेतृत्वाला अनुयायित्व आणि सामर्थ्य मिळते आहे असे दिसताच भांडवलदार जागे झाले. त्यांनीही मार्क्सच्या 'दास कॅपिटल'चा अभ्यास केला आणि मार्क्सवादी सिद्धान्त आणि साधने आत्मसात केली. विसाव्या शतकात रस्त्यावरील माणसापासून (street urchin) ते राष्ट्राध्यक्षापर्यंत सर्वांनी अर्थशास्त्र आणि इतिहास यांना मार्क्सिस्ट दृष्टिकोनाने बघायला सुरुवात केली. कडव्या भांडवलदारांनी मार्क्सच्या भाकितांना टोकाचा विरोध केला पण मार्क्सच्या विश्लेषणाचा मात्र अंगीकार आणि वापर केला. सी. आय. ए. ने जेव्हा १९६८ मध्ये व्हिएतनाम आणि चिले येथील परिस्थितीचा अभ्यास केला तेव्हा त्यांनी तेथील समाजाला वर्गपद्धतींमध्येच पहिले. जेव्हा निक्सन आणि थॅचर जग समजून घेत होते तेव्हा त्यांनी हाच प्रश्न विचारला की अत्यंत महत्वाची अशी उत्पादनाची साधने कुणाच्या मालकीची आहेत. १९८९ ते १९९१ मध्ये जॉर्ज बुश यांनी कम्युनिस्ट 'सैतानी सत्तेचा' पाडाव होताना पहिला आणि १९९२ मध्ये बिल क्लिंटन यांच्याकडून पराभव पत्करला. क्लिंटन यांची जिंकणारी व्यूहरचना (winning strategy) एका वाक्यामध्ये सांगता येते - 'It's the economy, stupid!'. खुद्द मार्क्सलाही हे यापेक्षा चांगले सांगता आले नसते.

जसे लोकांनी मार्क्सिस्ट विश्लेषणाचा आधार घेतला तसे त्यांनी स्वतःचे वर्तन बदलले. ब्रिटन आणि फ्रान्स येथील भांडवलदारांनी कामगारांच्या किमान चांगल्या भवितव्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले, त्यांच्या राष्ट्रीय जाणिवेला सशक्त केले आणि राजकीय व्यवस्थेत त्यांना सामावून घेतले. याचा परिणाम म्हणून जेव्हा मजूर निवडणुकांत मतदान करू लागले आणि मजूर पक्षांना

एकामागून एक देशांमध्ये सत्ता मिळाली, तेव्हा भांडवलदार अजूनही 'चैन की नींद' घेऊ शकत होते. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून मार्क्सची भाकिते पूर्णपणे चुकीची ठरली. ब्रिटन, फ्रान्स आणि अमेरिकेत कधीही कम्युनिस्ट क्रांती झाली नाही आणि कष्टकऱ्यांची सत्ता केराच्या टोपलीत गेली.

ऐतिहासिक ज्ञानाचा हा विरोधाभास आहे. ज्या ज्ञानामुळे वर्तनात काहीच फरक पडत नाही ते काही कामाचे नाही. पण ज्या ज्ञानामुळे वर्तनात फरक पडतो ते ज्ञान लवकरच कालबाह्य होते. जेवढी आपल्याकडे जास्त माहिती असेल तेवढा आपल्याला इतिहास जास्त चांगला समजू शकतो, तेवढे भविष्यात घडणाऱ्या घटना आपण इतिहासाच्या आकलनामुळे बदलू शकतो आणि तेवढेच आपले ज्ञान कालबाह्य होत जाते.

काही शतकांपूर्वीपर्यंत मानवी ज्ञान हळूहळू वाढत होते. त्यामुळे राजकारण आणि अर्थशास्त्रही हळूहळू बदलत होते. आज आपले ज्ञान प्रचंड वेगाने वाढते आहे आणि त्यामुळे खरेतर आपल्याला जग अधिकाअधिक समजायला हवे. परंतु याच्या अगदी उलटे घडते आहे. आपल्याला मिळालेल्या नवीन ज्ञानामुळे आर्थिक, राजकीय आणि सामाजिक बदल वेगाने घडत आहेत. घडणाऱ्या बदलांचा अर्थ लावण्यासाठी आपण ज्ञाननिर्मिती अधिक वेगाने करत आहोत आणि त्यामुळे अधिक गोंधळाची स्थिती निर्माण होते आहे. याचा परिणाम म्हणून आपली वर्तमानातील घटनांचा अर्थ लावण्याची आणि भविष्यातील घटनांचा अंदाज लावण्याची क्षमता कमी होत चालली आहे. इ.स. 1016 मध्ये 1050 मध्ये युरोप कसा असेल याचे भाकीत करणे तुलनेने सोपे होते. अर्थातच, अंदाजापेक्षा काही साम्राज्ये नष्ट झाली असली असती, काही अज्ञात टोळ्यांनी आक्रमण केले असते आणि काही नैसर्गिक आपत्ती आल्या असतील, तरीही 1016 प्रमाणेच 1050 मधील युरोपवर राजे आणि धर्मगुरू यांचेच राज्य असेल, तो कृषिप्रधान समाज असेल, बहुतांश प्रजा शेतकरी असेल आणि जनता दुष्काळ, प्लेग आणि युद्धामुळे दुःखी जीवन कंठत असेल. या तुलनेत 2016 मध्ये आपल्याला 2050 मध्ये युरोप कसा असेल याचा फारसा अंदाज बांधता येत नाही. 2050 ची राजकीय व्यवस्था कशी असेल, बहुतांशी लोक कुठल्या प्रकारच्या नोकरी/ व्यवसाय करत असतील किंवा तेव्हाच्या लोकांची शरीरे आजच्यापेक्षा किती वेगळी असतील याबद्दल आपल्याला फारसा तर्क करता येत नाही.

## लॉन्सचा छोटासा इतिहास

असे साधारणतः दिसते की वैज्ञानिक दृष्टिकोनातून केलेल्या व्यवस्थांच्या (किंवा रचनांच्या) अभ्यासाचा उद्देश भविष्याविषयी अंदाज वर्तवणे हा असतो - हवामानशास्त्रज्ञांना पाऊस पडणार की नाही हे सांगता येणे, अर्थतज्ज्ञांना चलन अवमूल्यनाचे आर्थिक महासंकट टाळता येईल की नाही हे सांगता येणे, डॉक्टरांना कॅन्सर कुठल्या उपचारपद्धतीने लवकर बरा होऊ शकेल हे सांगता येणे इ. हा नियम आपण इतिहासाला लावला तर काय दिसते? भविष्याचा अंदाज वर्तवू शकतील असे इतिहासाचे ठराविक सिद्धान्त किंवा नियम नसतील, तर इतिहासाचा अभ्यास का करायचा? इतिहासतज्ज्ञांनी आपल्या पूर्वजांच्या कृत्यांचा आणि घटनांचा अभ्यास करणे अपेक्षित असते, जेणेकरून आपण पूर्वजांचे चांगले निर्णय 'कॉपी' करू शकू आणि त्यांनी घेतलेले चुकीचे निर्णय टाळू शकू. पण असे कधीच घडताना दिसत नाही कारण वर्तमान भूतकाळापेक्षा वेगळा आहे. त्यामुळे हॅनिबलच्या दुसऱ्या प्युनिक युद्धातील डावपेच शिकणे तिसऱ्या महायुद्धासाठी उपयोगी पडणार नाहीत. घोडदळाच्या युद्धात ज्या तंत्रांनी विजय मिळवून दिला त्याचा सायबरयुद्धात उपयोग होत नाही.

अर्थात व्यवस्थांचा अभ्यास फक्त भविष्याबद्दल अंदाज बांधते असे नाही. विविध विषयांमधील तज्ज्ञ आपले ज्ञानाचे क्षितिज विस्तारतात, ज्याद्वारे ते आपल्याला नवीन किंवा माहीत नसलेले भविष्यातील मार्ग दाखवतात. इतिहासाबद्दल तर हे थोडे जास्तच खरे आहे. जरी इतिहासतज्ज्ञ कधीकधी भविष्यवाणी करतात (आणि त्यात त्यांना मर्यादितच यश लाभते) तरी सहजपणाने आपल्याला लक्षात येणार नाही अशा शक्यतांबद्दल आपल्याला जाणीव करून देणे हे इतिहासाच्या अभ्यासाचे प्रमुख ध्येय आहे. इतिहासतज्ज्ञ इतिहासाचा अभ्यास करतात तो इतिहासाची पुनरावृत्ती करण्यासाठी (किंवा टाळण्यासाठी) नव्हे, तर इतिहासापासून मुक्त होण्यासाठी.

आपल्यापैकी प्रत्येकजणाचा जन्म हा एका ऐतिहासिक परिस्थितीत झालेला आहे ज्याला विशिष्ट नियम आणि विशिष्ट मूल्ये लागू होतात आणि जी परिस्थिती एका अद्वितीय अश्या आर्थिक आणि राजकीय परिस्थितीने घडलेली आहे. आपण ही परिस्थिती गृहीतच धरून चालतो, जणू काही ती परिस्थिती नैसर्गिक, अपरिहार्य आणि अपरिवर्तनीय आहे. आपण हे विसरून जातो की आपले जग हे अपघाती घटनांच्या माळेने घडलेले आहे आणि इतिहासाने

आपले केवळ तंत्रज्ञान, राजकारण आणि समाज यांनाच आकार दिलेला नाही तर आपले विचार, भीती आणि स्वप्नेही इतिहासानेच घडलेले आहेत. आपल्या भूतकाळाचा थंडगार पंजा आपली मान पकडतो आणि आपल्याला अपरिहार्य अशा एकाच भविष्यकाळाकडे बघायला लावतो. आपण ही पकड जन्मापासून अनुभवलेली असते. त्यामुळे आपण गृहीत धरून चालतो की ती परिस्थिती आपल्या असण्याचा नैसर्गिक आणि अविभाज्य भाग आहे. त्यामुळे आपण क्वचितच स्वत:ला मुक्त करतो आणि शक्य असलेल्या दुसऱ्या भविष्यकाळाची स्वप्ने क्वचितच पाहतो.

भूतकाळाच्या पंजाची पकड सैल करणे हे इतिहासाच्या अभ्यासाचे उद्दिष्ट आहे. आपले डोके डावी-उजवीकडे वळवून आपण अशा शक्यता ध्यानी घेऊ लागतो ज्या आपल्या पूर्वजांच्या कल्पनेपलीकडे होत्या किंवा त्या आपल्या कल्पनेपलीकडे असाव्यात अशी पूर्वजांची इच्छा होती. आपल्या सद्य-परिस्थितीला कारणीभूत असणाऱ्या ऐतिहासिक अपघातांची मालिका बघताना आपल्याला आपले विचार आणि स्वप्ने कशी घडली याची जाणीव होते आणि आपण वेगळ्या पद्धतीने विचार करू शकतो आणि वेगळी स्वप्ने बघू शकतो. इतिहासाचा अभ्यास आपल्याला या शक्यतांपैकी काय निवडावे हे सांगू शकणार नाही पण किमान काही पर्याय दाखवू शकतो.

जग बदलून टाकण्याची इच्छा बाळगणाऱ्या चळवळी नेहमी इतिहास-पुनर्लेखनापासून सुरुवात करतात ज्याने लोक भविष्याकडे नव्याने बघण्यास तयार होतील. तुम्हाला कामगारांनी संपावर जाणे हवे असेल किंवा स्त्रियांनी त्यांच्या शरीरावर स्वतः:चा हक्क गाजवणे हवे असेल किंवा पिचलेल्या अल्पसंख्याकांनी राजकीय हक्कांची मागणी करून हवे असेल - त्यांचा इतिहास त्यांना पुन्हा सांगणे ही त्याची पहिली पायरी आहे. नवीन इतिहास सांगेन की - 'आपली सद्यःस्थिती ही नैसर्गिकही नाही आणि कायमस्वरूपी टिकणारीही नाही. गोष्टी पूर्वी वेगळ्या होत्या, शक्य असलेल्या घटनांची केवळ एक मालिका सध्याच्या अन्यायकारक जगास कारणीभूत आहे. आपण जरा विचारपूर्वक निर्णय घेतले तर आपण नक्कीच यापेक्षा कितीतरी चांगले जग घडवू शकू.' या कारणामुळे मार्क्सिस्ट लोक भांडवलशाहीच्या इतिहासाची हकीकत सांगतात, स्त्रीवादी लोक पितृसत्ताक समाजांच्या घडणीचा अभ्यास करतात आणि आफ्रो-अमेरिकन हक्कांच्या चळवळीतील लोक गुलामांच्या व्यापाराचे स्मरण जागृत

ठेवतात. त्यांचे उद्दिष्ट इतिहासाप्रमाणेच भविष्य चालावे असे नसते तर त्यापासून मुक्त होणे हे असते.

जे भव्य अशा सामाजिक क्रांत्यांबद्दल खरे आहे तेच अगदी रोजच्या जगण्यातील छोट्या गोष्टींबद्दलही तेवढेच खरे आहे. स्वतःचे घर बांधणारे एखादे तरुण जोडपे आर्किटेक्ट्ला सहज सांगून जाते - 'आम्हाला बंगल्याच्या पुढच्या भागात चांगले छान असे लॉन (हिरवळ) हवे आहे!'. हिरवळच का बरे असे विचारल्यावर ते सहजपणे सांगतील 'बंगल्यासमोर हिरवळ छान दिसते!' पण त्यांना असे का वाटते त्यामागेही इतिहास आहे.

अश्मयुगातील शिकारी-वेचक (hunter-gatherer) लोकांनी कधी त्यांच्या गुहेपुढे हिरवळ वाढवली नाही, अथेनियन अक्रोपोलिसमध्ये किंवा रोमन कॅपिटॉलमध्ये किंवा जेरुसलेममधील ज्यू मंदिरात प्रवेश करणाऱ्या कुणाचेही स्वागत लॉनने केले नाही. खाजगी निवास किंवा सार्वजनिक इमारतींपुढे लॉन वाढवावे या कल्पनेचा उदय उत्तर-मध्ययुगात ब्रिटिश आणि फ्रेंच अमीर-उमरावांच्या प्रासादात झाला. पूर्व-आधुनिक युगात या सवयीने चांगलेच मूळ धरले आणि ते उमदेपणाचे प्रतीक बनले.

चांगली देखभाल केलेल्या लॉन्सला जमीन लागते आणि त्यासाठी खूपसे काम करावे लागते. विशेषतः:गवत-कापणी यंत्रांच्या आणि तुषार-सिंचनाची सोय नसलेल्या काळाच्या संदर्भात तर हे फारच खरे आहे. या कष्टाच्या आणि जागेच्या बदल्यात लॉन्सकडून कामाचे काहीही मिळत नाही. त्याच्यावरती प्राण्यांना चरायलाही सोडता येत नाही कारण त्याने ते गवत खराब होते. गरीब कष्टकऱ्यांना लॉन्सवरती जागा आणि वेळ खर्च करणे अजिबातच शक्य नव्हते. मोठ्या वाड्याच्या सुरुवातीलाच असलेले नीटनेटके गवत हे 'स्टेटस सिम्बॉल' बनले. ते जणू काही येणाऱ्या प्रत्येकाला सांगत असे - 'मी एवढा श्रीमंत आणि शक्तिशाली आहे आणि माझ्याकडे एवढी जमीन आहे की हा हिरवा दिमाख मला परवडू शकतो.' लॉन जेवढे मोठे आणि जेवढे व्यवस्थित, तेवढे सामर्थ्य अधिक! तुम्ही जर एखाद्या सरदाराला भेटण्यास गेलात आणि त्याचे लॉन जर व्यवस्थित नसेल तर नक्कीच त्याचे दिवस वाईट चालले आहेत असे समजण्यास हरकत नव्हती. महत्त्वाचे समारंभ आणि कार्यक्रम हे या लॉनवरती होत आणि इतर वेळी त्यावर जायला मज्जाव असे. आजही अनेक राजवाडे, सरकारी कार्यालये आणि सार्वजनिक जागांवरती शिस्तशीर सूचना असतेच - 'कृपया लॉनवर जाऊ नये'.

मी जिथे शिकलो त्या ऑक्सफर्ड कॉलेजमध्येही एक मोठ्या चौकोनी भागावरती आकर्षक लॉन होते ज्यावर आम्हाला चालण्यास किंवा बसल्यास वर्षातून केवळ एक दिवस परवानगी होती, इतर कुठल्याही दिवशी त्यावर चालणाऱ्या किंवा बसणाऱ्या विद्यार्थ्यांची खैर नसे.

भव्य राजवाडे आणि सरदारांचे वाडे यांनी लॉन्सना अधिकाराचे प्रतीक म्हणून वापरले. जेव्हा उत्तर-आधुनिक काळात राजांची सत्ता गेली किंवा उमरावांना गिलोटीनवरती बळी दिले गेले, तेव्हा त्यांची जागा घेतलेल्या राष्ट्राध्यक्षांनी आणि पंतप्रधांनांनीही लॉन्सची परंपरा मात्र चालू ठेवली. संसद, सर्वोच्च न्यायालये, राष्ट्राध्यक्षांची निवासस्थाने आणि इतर सार्वजनिक इमारतींनी त्या गवताच्या पात्यांवरती आपला अधिकार प्रस्थापित केला. त्याचवेळी, लॉन्सनी क्रीडा-जगतावरही आपले वर्चस्व प्रस्थापित केले. गेली हजारो वर्षे माणसे सर्व प्रकारच्या (बर्फापासून ते वाळवंटी प्रदेशापर्यंत) मैदानांवरती खेळ खेळत आणि तरीही गेल्या दोन शतकांमध्ये फुटबॉल आणि टेनिससारखे महत्त्वाचे खेळ लॉन्सवरतीच खेळले जातात. अर्थात तुमच्याकडे पैसे असतील तर! रिओ दे जानेरोच्या झोपडपट्ट्यांमध्ये ब्राझिलियन फुटबॉलची पुढची पिढी धुळीत आणि वाळूमध्ये फुटबॉल खेळते आहे. परंतु श्रीमंत उपनगरांमध्ये धनिकांची मुले काळजीपूर्वक वाढवलेल्या लॉनवरती खेळण्याचा आनंद घेत आहेत.

अशा तऱ्हेने माणसे लॉन्सचा संबंध राजकीय ताकद, सामाजिक स्थान किंवा आर्थिक संपदेशी जोडतात. एकोणिसाव्या शतकात नव-प्रस्थापितांनी उत्साहाने लॉन्सचा स्वीकार केला. सुरुवातीला फक्त बँकर्स, वकील किंवा उद्योगपतींनाच त्यांच्या निवासासमोर लॉन्स परवडत असत. औद्योगिक क्रांतीमुळे जेव्हा मध्यमवर्गाची वाढ झाली आणि गवत-कापणीयन्त्रे (lawn-mowers) आणि तुषार-सिंचन (sprinklers) विकत घेणे सामान्यांच्या आवाक्यात आले तेव्हा मात्र लाखो कुटुंबांना अचानक लॉन असणे परवडू लागले. अमेरिकेतील उपनगरांमध्ये छोटेसे वैयक्तिक लॉन हे श्रीमंतांची हौस न राहता मध्यमवर्गीयांची गरज बनली.

रविवारी सकाळी चर्चला जाऊन आल्यानंतर अनेक लोक भक्तिभावे आणि समर्पितपणे त्यांच्या हिरवळीची कापणी करत असत. जणू काही हाही रविवारच्या प्रार्थनेप्रमाणे एक संस्कार ठरला. सध्या तर मका आणि गव्हानंतर

लॉनचे गवत हे अमेरिकेतील सर्वात जास्त पसरलेले 'पीक' आहे आणि खत, बियाणे, गवत-कापणी यंत्रे, तुषार सिंचक आणि माळी यांनी मिळून बनलेली 'लॉन इंडस्ट्री' अनेक अब्ज डॉलर्सचा आकडा पार करते आहे.

लॉन्स केवळ अमेरिकन किंवा युरोपियन लोकांचेच 'फॅड' बनून राहिलेले नाही. जगभरातील लोक टीव्हीवरून अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना व्हाईट हाऊसच्या लॉनवरून भाषण देताना ऐकतात, फुटबॉलचे सामने खेळले जाताना पाहतात. जगभरातील लोक लॉन्सचा संबंध सामर्थ्य, पैसे आणि प्रतिष्ठेशी लावतात. अगदी मुस्लिमजगतातील मध्यवर्ती ठिकाणही लॉन्सनी जिंकले आहे. कतारमध्ये नवीनच बांधलेल्या इस्लामीकलेच्या संग्रहालयासमोर देखणे लॉन आहे, ज्याची जवळीक हारून-अल-रशीदच्या बगदादपेक्षा सोळाव्या लुईच्या व्हर्सायशी जास्त आहे. जर पांढरे झगे आणि काळे हिजाब नसतील तर दोहा-दुबईच्या उपनगरांत फिरताना असे वाटू शकते की तुम्ही मध्यपूर्वेत नाही तर मध्यपश्चिमेत आहात.

लॉन्सचा हा छोटासा इतिहास वाचल्यानंतर जेव्हा तुम्ही तुमच्या स्वप्नातील घराचा विचार कराल तेव्हा कदाचित तुम्ही तुमच्या घराच्या समोर लॉन असण्याबद्दल दोनदा विचार कराल. तुम्ही अर्थातच घरासमोर लॉन करून घेण्यासाठी मोकळे आहात आणि युरोपीय सरदार, भांडवलदार उद्योगपती यांच्याकडून आलेले सांस्कृतिक जोखड फेकून देऊन तुमच्या घरापुढे कदाचित जपानी रॉक-गार्डन किंवा अगदीच नवीन काही करण्यासाठीही तुम्ही मोकळे आहात. इतिहास शिकण्याचे हे सगळ्यात उत्तम कारण आहे – भविष्याचा अंदाज बांधण्यासाठी नाही तर भूतकाळापासून मुक्त होऊन पर्यायी शक्यतांचा विचार करण्यासाठी. अर्थातच ही काही पूर्ण मुक्ती नाही. आपण भूतकाळामुळे झालेली आपली घडण पूर्णपणे टाळू शकत नाही, पण काही मुक्तता ही पूर्ण बंधनापेक्षा नक्कीच बरी!

(युवल नोह हरारी (Yuval Noah Harari) यांच्या होमो ड्यूस (Homo Deus) या पुस्तकातील दोन उप-प्रकरणांचा हा अनुवाद.)

ईमेल: dhananjaymuli@gmail.com

**प्रतिसाद**

# ध्यान-मीमांसा

*उल्हास जाजू*

*विपश्यना, साक्षात्कार, वैज्ञानिक आकलन, मेंदूविज्ञान*

---

'आजचा सुधारक'च्या जून व जुलै 2016च्या भागामध्ये 'साक्षात्कारामागील वैज्ञानिक सत्य' व 'साक्षात्कार : वैज्ञानिक स्पष्टीकरण' ह्या दोन लेखांमधून डॉ. रवीन्द्र टोणगावकरांनी 'साक्षात्कार'ची ह्या संकल्पनेचे वैज्ञानिक विश्लेषण केले होते. त्याच विषयाची दुसरी बाजू मांडणारा व त्याचबरोबर ध्यान, ईश्वर, भक्ती ह्या संकल्पनांचा गांधी-विनोबा परंपरेतला अर्थ विशद करून सांगणारा आणखी एका डॉक्टरांचा हा लेख, *आजचा सुधारक*ची संवादाची परंपरा नक्कीच पुढे नेईल.

---

आपल्या लेखनात डॉ. रवीन्द्र टोणगावकरांनी साक्षात्काराची वैज्ञानिक विश्लेषणात्मक बाजू मांडताना खालील विधाने केली आहेत: ''ध्यानावस्थेत देवांच्या विचाराचा कैफ चढल्यामुळे किंवा त्या विचारांनी आलेली उन्मादावस्था, झिंग (God Intoxication) या अवस्थेत स्वतःच्या अंतर्मनातून आलेले जे विचार असतात, त्यांनाच अंतिमसत्य मानून, त्यावर भाबडा विश्वास ठेवून, त्यांना साक्षात्कार किंवा दैवी संदेश म्हटले जाते.''

''ध्यानधारणा, योगाभ्यास, आर्ट ऑफ लिव्हिंग, विपश्यना, सिद्ध-समाधि-योग, राजयोग इत्यादी साधनातून मिळणाऱ्या सुखामागे मेंदूत मुक्त होणारे Endorphins आहेत. कपालभाती, भस्त्रिका, सुदर्शनक्रिया ह्यांसारखे प्राणायाम करून आधी मेंदूतील रक्तपुरवठा कमी करून 'कृत्रिमसंकट', 'स्ट्रेस' निर्माण करायचे आणि या संकटामुळे मेंदूत निर्माण झालेल्या Endorphins मुळे मिळणारा तात्पुरता स्वर्गीय आनंद अनुभवायचा! या सर्व साधनातून मिळणारे स्वर्गीय सुख हे तात्कालीन आणि आभासी आहेत. Superior parietal lobe of brain च्या dysfunction मुळे होणाऱ्या loss of space orientation तून होणारा 'अहम् ब्रह्मास्मि' चा भ्रम (Hallucination) मात्र सत्य वाटायला लागतो.'' डॉ. रवीन्द्र टोणगांवकरांना वरील बाब स्वानुभवाने पटलेली आहे.

वरील विधानांचे विश्लेषण करताना आपण खालील बाबी प्रथम समजावून घेतल्या पाहिजेत. --

(अ) मनुष्याला आकलन कसे होते?

आमच्या मेंदूचे (Cerebral Cortex) दोन भाग आहेत. डावा मेंदू वैज्ञानिक युगात प्रभुत्व असणारा (Dominant) मानला जातो, बुद्धीचे क्षेत्र आहे, तार्किक (rational) आहे, गणिती आहे, मोजमाप करू शकतो, cause आणि effect relationship हुडकून काढू शकतो, पुनरावृत्ती (replicability) ची शक्ती साठवून असतो आणि वैज्ञानिकतेची जननी आहे. सारांश बुद्धिप्रामाण्यतेने झालेल्या आकलनाचे ते क्षेत्र आहे, त्यातून Explicit knowledge प्राप्त होते. उजवा मेंदू मात्र सांस्कृतिक जाणीव, संगीताची मधुरता, रंगांची भाषा, भावनाशीलता, अंतःप्रेरणा इ.चे आकलन करणारे आहे. या आकलनात समग्रता असते (multifactorial perception), झालेल्या जाणिवेचा (अनुभूतीचा) उगम शोधता येत नाही./Multifactionial perception ची पारस्परिकता जाणणे (cosmic relationship) म्हणजे निसर्गाला जाणणे, त्याची पुनरावृत्ती करता येत नाही, ते व्यक्तिगत अनुभूतीचे क्षेत्र आहे. शब्दांच्या पलिकडचे आकलन, अंतर्मनाचा कल ओळखणाऱ्या ह्या ज्ञानाला Tacit Knowledge म्हणतात. बाह्य जगतातले निसर्गाच जे नियम बुद्धिप्रामाण्याने उकलले जाऊ शकतात, प्रतिष्ठापित करता येतात, प्रयोगाने सिद्ध केले जातात, त्यास विज्ञान म्हटले जाते. काही नियम आम्ही बुद्धीने, संशोधनाने सिद्ध केलेले असतात (विज्ञान); तरीही बरेच नियम अजून बुद्धिगम्य झालेले नाहीत, प्रयोगांनी सिद्ध करता येत नाहीत. मात्र त्यांचा अनुभव येतो. त्याची अनुभूति होते. त्यांना भ्रम म्हणणे अवैज्ञानिक ठरेल. ''मला माहीत नाही.'' हे म्हणणे अधिक वैज्ञानिक असेल. बुद्धी जेव्हा किंकर्तव्यमूढ होते, तेव्हा हृदयाची हाक मार्ग दाखविते. डावा मेंदू (बुद्धी) वैज्ञानिकतेचे वाहन आहे, उजवा (हृदय) अध्यात्मिकतेचे (निसर्गाशी एकरूपतेचे)!

मृत्यूच्या काही तासानंतर शरीर rigid कसे होते? शरीरातून काय निघून गेले, ज्यामुळे चेतनाच नष्ट होऊन चालत असलेले शरीर काष्ठवत होते? ते न दिसणारे चेतन तत्त्व, अस्तित्वातच नाही हे म्हणण्याला कोणता वैधानिक आधार आहे? स्वतःला चालविणाऱ्या चेतनतत्त्वाला तसेच निसर्गाला (Cosmos) चालविणाऱ्या तत्त्वाला आम्ही अनुभवतो की नाही? मानवाने नैसर्गिक नियमांची

अवहेलना केली. म्हणून पर्यावरण संकट उभे राहत आहे. ह्यामागचे विज्ञान आम्हाला कळायला लागले की नाही? निसर्गाशी एकरूप होऊन जगणे जर आम्ही शिकलो नाही तर विनाश ओढवेल ह्याचे भान आम्हाला होत आहे ना?

बुद्धिप्रामाण्यतेचा कस लावून, साक्षात्काराला भ्रम ही संज्ञा डॉ. रवीन्द्र टोणगावकरांनी दिली आहे. बुद्धिग्राह्यतेपलिकडे हृदयग्राह्य अनुभूती आमच्या जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव आहे की नाही?

'तर्कालाच सत्य मानणे' ह्या श्रद्धेचे नाव आहे अंध-अश्रद्धा! आपण अंधश्रद्धा जितकी चूक मानतो, अंध-अश्रद्धा तेवढीच चूक आहे.

**ईश्वरीय संकल्पना कोणती?**

उत्क्रांत मनःस्थिती निसर्गाला ईश्वर (निर्गुण-निराकार) मानते. त्या अनाकलनीय देवाला (obstracl), निसर्गाच्या बुद्धिगम्य नसलेल्या नियमांना, बुद्धीने अंशतःच जाणले जाऊ शकते (विज्ञान). मात्र पूर्णत्वाचे आकलन बुद्धी करू शकत नाही. निसर्ग एक cosmos आहे, chaos नाही. निसर्गात परस्परपूरकता आहे आणि परस्परनियंत्रणही. त्या Abstract संकल्पनेला समग्रतेनेच जाणून घ्यावे लागले. ती शक्ती उजव्या मेंदूत (हृदय) आहे. बाह्य निसर्गातील ईश्वर मी अनुमानाने, अप्रत्यक्ष कल्पनेत आणू शकतो. मात्र माझ्यातील चेतनतत्त्वाला सिद्ध करायचे असेल तर ते चैतन्य कॉन्शन्स माझ्या हृदयातच व्हावे लागेल.

सर्वसाधारण व्यक्तीला ही abstract साधना अशक्य वाटते, म्हणून आकलनाच्या मर्यादेत येणारी ईश्वरीय संकल्पना गुणसमुच्चयाची मानली गेली (सगुण-निराकार). कोणत्याही एका व्यक्तीवर साकल्याचा (देवत्वाचा, पूर्णत्वाचा) आरोप करता येत नाही. म्हणून एका-एका गुणामागे एक-एक अवतार (सगुण-साकार) अनुभवणे सोपे जाते. राम सत्याचे, बुद्ध करुणेचे, ईसा प्रेमाचे, महंमद शांतीचे, कृष्ण अनासक्तीचे प्रतीक! सगुण साकार देवाचे श्रेयस रूप म्हणजे गुरु. माझ्यासारखा हाडामांसात वावरणारा मानवदेह, त्याच्या गुणविशेषामुळे मला हवा-हवासा वाटतो. मला अनुकरणीय वाटतो. मात्र त्यावर साकल्याचा आरोप मी करत नाही. दत्तात्रेयाचे तेवीस गुरु मानले गेले. जर मी गुरूला देव मानायला लागलो तर गुरु पूजनीय होतो, अनुकरणीय ठरत नाही. मग माझे आरोहन (गुण-संवर्धन) खुंटते. 'गुरु-गोविंद दोऊ खड़े काके लागूं पाय, बलिहारी गुरुदेव की, गोविंद दियो बताय।'' हे गुरु जनसामान्यांचे पथप्रदर्शक ठरतात. त्यांच्या

बुद्धिप्रामाण्याला नम्रतेची झालर असते. निसर्गाशी अद्वैत साधता आले नाही तरी परमोच्च द्वैताची उपासना करणारे पथप्रदर्शक असतील.

माझ्यासारख्या सर्वसाधारण मनोवृत्तीच्या माणसाला सगुण-साकार देव भावतो. मी त्याचे आलंबन घेतो. मात्र आलंबन माझ्या अर्थासाठी घेतो, तो अर्थ स्थूल झाला, किंवा ज्या सूक्ष्मवस्तूच्या प्रकाशासाठी आलंबन घेतले तो प्रकाश गौण झाला, आलंबन बलवान ठरले, ज्या विचारासाठी आलंबन घेतले तो विचार झाकला गेला तर धोका उद्भवतो. आलंबन न घेतले तर विचार अस्पष्ट होतो. सद्भावना अव्यक्त रूपांत पसरत असते, परंतु विचार अव्यक्त रूपांत घनाकार होत नाही - म्हणून आम जनतेला त्याचे आकर्षण राहत नाही. आरोहणाची पहिली पायरी म्हणून आलंबन घेतले तरी पुढच्या पायरीवर आलंबन विसर्जित करून त्यामागील गुणावर/विचारावर (सगुण-निराकारावर) एकाग्र होता आले पाहिजे. सगुण-साकाराचा अहंकार सोडता यायला पाहिजे. आलंबन घेण्याचा धोका ओळखणारा आणि मनुष्य एक सामाजिक प्राणी आहे, व्यक्तीचे भले समाजाच्या भल्यात सामावलेले आहे, हे जाणणारा माणूस आपल्या विचाराच्या उत्क्रांतीने समाजाला ईश्वर मानेल (सगुण-निराकार). मग पंथ आणि संप्रदायापासून मुक्ती मिळेल आणि एक सामाजिक प्राणी म्हणून वावरत असताना मानवधर्माच्या गुणोपासनाकडे पावले उठतील, समाजनिष्ठा बाणवेल. दरिद्रनारायण आराध्य होईल. सामाजिक जीवनात सर्वधर्मसमभाव आणि समता, मैत्री आणि स्वातंत्र्याची मूल्ये जोपासली जातील. सर्वोदयाच्या परिघिमध्ये अंत्योदयाची वाटचाल सुनिश्चित होईल. सामूहिक समाजजीवनाचे पाथेय रेखांकित होईल.

देवाची गरज माणसाला का भासते हेही समजून घेतले पाहिजे. निसर्गाने माणसाला बुद्धी दिली. तो स्वप्न बघू शकतो, संशोधन करू शकतो. मात्र मी मरणार आहे हे बुद्धीने जाणतो. परिणामतः जीवयोनीत मनुष्य सर्वांत असहाय्य आणि एकाकी प्राणी आहे. तो जीवनात आधार शोधत असतो (देवाचा, समाजाचा, गुरुचा). तो नात्यात जगतो, खोटा का होईना आधार पावतो. अन्यथा असुरक्षितता, एकटेपणा व मृत्यूचे भय त्याला वेडे बनवील! मानसिक आधार मनुष्यजीवनाची जैविक गरज (biological necessity of life) आहे.

**ध्यान आणि संमोहनावस्था (**Hypnotic Trance**) मध्ये फरक तो कोणता?**

ध्यान म्हणजे स्वतःला पूर्णपणे जाणून घेण्याची क्रिया. ध्यानाचा पहिला अंश आहे - दोष निरीक्षण. जेव्हा आपल्यातील दोष दिसायला लागतात, तिथून

उत्कर्षाचा प्रारंभ होतो. अहंकार प्रतीत व्हायला लागला तर समजावे की उत्कर्षाचा अंत झाला.

ध्यानाचा दुसरा अंश आहे दोषनिरसनाचा संकल्प. जिथे दोष दिसले, त्यास स्वच्छ करून घेणे म्हणजे स्वाध्याय. ज्याचे चित्त शुद्ध असते, त्याला आपला अल्प दोषसुद्धा त्रास देतो, म्हणून तो आत्मनिंदा करतो. तो आपल्या दोषांना मोठे करून बघतो, दुसऱ्याचे दोष त्याला दिसत नाहीत. तो तुलना करीत नाही. आध्यात्मिक परीक्षणाचा हा मार्ग आहे. ध्यानाचा तिसरा अंश नम्रतेची पराकाष्ठा होऊन ईश्वराकडून मदतीची अपेक्षा म्हणजे भक्ती.

''ध्यानात निद्रेतील तन्मयता असते. परंतु शून्यता नसते, जागृती असते. ती एक गाढ जागृत निद्रा आहे. आपल्या सर्व वृत्ती नष्ट होऊन केवळ एक वृत्ती-वर्तमान-बाकी उरेल ह्या अवस्थेचे नाव आहे ध्यान. ध्यानात व्यक्ती निरंतर सावधान असते.'' - *विनोबा*

''Awareness of whole process, both conscious and hidden, is meditation. The awakening experience, uncovering process of conditioning and going beyond is meditation. When thinker/observer look at the thing without label, without term, without symbol, is meditation.The very essence of self-knowledge is meditation.'' - *J. Krishna Murthy*

ध्यानाच्या अनेक पद्धती आहेत. काही संमोहनाचा (Hypnotism) आधार घेतात. संमोहन एक अर्धनिद्रित अवस्था आहे. संमोहित होणारी व्यक्ती, संमोहित करणाऱ्या व्यक्तीच्या आहारी जातो आणि तो जसे सुचवेल (suggestion/आदेश) तशी वागते. 'अहंम् ब्रह्मास्मि'च्या समजुतीवर चित्तवृत्ती स्थिर करून सतत अभ्यासाने वृत्ती दृढ केली (programming of brain) म्हणजे हाच सत्याचा अनुभव आहे. आणि हाच आत्मबोध आहे. ही भ्रामक धारणा होऊन जाते. ती स्वतः बनविलेली चित्तवृत्ती आहे हे ध्यानात येत नाही. वारंवार पुनरावृत्तीमुळे दिलेले suggestion संमोहित अवस्थेत सत्य वाटायला लागते. मनुष्य स्वतःचा विवेक हरवून बसतो. अश्या संमोहित अवस्थेच्या (Hypnotic Trance) अर्धनिद्रित अवस्थेला ध्यान म्हणणे चुकीचे ठरेल, कारण त्यात विवेकपूर्ण चिंतनाची वाटचाल करण्याची शक्यता नाही. जी

व्यक्ती विवेकी असेल, विचारनिष्ठ असेल, कमजोर नसेल, तिला संमोहित करता येत नाही. विवेकपूर्ण (श्रद्धा+बुद्धी) चिंतनासाठी जागृतता हवी, सजगता हवी ह्याशिवाय एकाग्रता साधता यायला पाहिजे. एकाग्रता साधण्याचे Hypnotic Trance एक अशुद्ध साधन आहे.

**साक्षात्कार आणि भ्रम(Hallucinations) यांतील फरक कोणता?**

डॉ. टोणगावकरांनी आपल्या बुद्धिप्रामाण्यवादी भूमिकेतून (Explicit knowledge) साक्षात्काराला भ्रम म्हटले. ती Dominant Brain ची कसरत आहे. साक्षात्काराचा अर्थ आहे - जो चित्ताला चिंतनाद्वारे मान्य झाला, त्याचे डोळ्याने दर्शन होणे. ती एक अनुभूती आहे - Holistic multifactorial right brain perception. साक्षात्कार आणि Hallucinations चा छडा कसा लावायचा? दोन्ही projections म्हणून अनुभवता येतात. मात्र त्या projections च्या प्रकटीकरणामागे चित्ताला स्पर्श करणारी संवेदना ओळखता आली तर त्याला साक्षात्कार म्हणावे. साक्षात्काराची अनुभूती खरी की खोटी, ह्याची परीक्षा व्यक्ती स्वतः करू शकते. विषय-वासना शमली तर खरी, विषयवासना तीव्र झाली तर खोटी! संवेदनाचा स्पर्शही नसताना अचानक प्रकट झालेले projection हे Hallucination मानावे. संवेदनाला ओळखून त्याच्या स्पर्शाने प्रकटलेली Intense (तीव्र) भावना, Hallucination ला नाकारेल.

''ईश्वराचे तीन साक्षात्कार - एक सर्वसामान्य जनतेच्या रूपाने, दुसरा विशाल प्रकृतीच्या रूपात आणि तिसरा अंतर्यामीच्या रूपात! विशाल वैज्ञानिक विश्व बाहेर उभे आहे, विशाल मानवता बाहेर उभी आहे, नीती आणि सेवेचे व्यापक क्षेत्र बाहेर उभे आहे, तितकेच विशाल एक तिसरे विश्व आहे - अंतर्विश्व। विज्ञानाचा अनुभव वैज्ञानिकांना, निष्कामसेवेचा अनुभव नीतिनिष्ठ सेवकांना होतो/दोन्ही अनुभव अपुरे आहेत, तिसऱ्या अनुभवाशिवाय, जो भक्तीद्वारा होतो. त्यात चित्ताच्या पलिकडचे जे दर्शन आहे, त्याचा साक्षात्कार होत असतो. ब्रह्मांडात परमात्म्याची सिद्धी तर्कावर आधारित आहे, तशीच पिंडात आत्म्याची सिद्धी स्वानुभूतीवर आधारलेली आहे. धर्म मुख्यतः Mystique experiences वर म्हणजे आत्मदर्शनावर आणि आत्मानुभूतीवर उभा असतो. त्याला श्रुती म्हणतात - धर्माचे मुख्य हार्द! मानवसेवा आणि निजनिष्ठेने मनुष्य शुद्ध होईल, विज्ञान-निष्ठेने बुद्ध होईल, मात्र सिद्ध तेव्हाच होईल जेव्हा निज-

चेतनेच्या आविर्भावाचा त्याला अनुभव होईल.''

**माझा विपश्यनाशिविराचा अनुभव**

एकाग्रता साधण्याची विपश्यना ही एक पद्धती आहे. मला ती अत्यंत वैज्ञानिक वाटली. त्याला ध्यान म्हणणे चुकीचे ठरेल. एकाग्रता साधण्याचे ते एक साधन आहे (technique). ध्यानासाठी एकाग्रता साधणे ही पहिली पायरी आहे. 'आनापान' प्रक्रियेत नाकपुडीतून आत-बाहेर होणाऱ्या श्वासावर लक्ष केंद्रित करणे शिकविले जाते. मनुष्याच्या शरीरातील अत्यंत संवेदनशील स्थानांपैकी एक स्थान नाकपुडी हे आहे. आत-बाहेर होणाऱ्या श्वासासोबत हलणाऱ्या केसांची संवेदना ओळखता येते. श्वासाच्या हालचालीवर चित्त एकाग्र करणे साधले, मन भटकू दिले नाही, तर कायेच्या अन्य भागांवर एकाग्र होणे सुचविले जाते. डोळ्यांवरील केसांच्या हालचालीवर मन केंद्रित होणे जमले तर कायेच्या इतर भागावर मन केंद्रित करताना संवेदनेचा एक प्रवाह मनासोबत धावताना (शरीरावर) अनुभव करता येतो. ह्या संवेदना आपल्या कायेवर नित्य असतात पण आपण त्याची उपेक्षा करीत असतो. एकाग्र मनःस्थितीत त्या जाणवतात. ह्याला काया-विपश्यना म्हणतात.

मात्र ह्या संवेदनेच्या प्रवाहासोबत खेळत राहिले तर विपश्यनेची पुढली पायरी गाठता येत नाही. ह्या पुढच्या पायरीला चिंतनोपश्यना म्हणतात. विपश्यना शिविरात रोज संध्याकाळी गोयन्काजीद्वारा जी 'धर्मचर्चा' होते, त्यातून आत्मचिंतनाकरिता बरेच खाद्य मिळते. त्या विचारावर एकाग्र होऊन सहजगत्या विश्लेषण सुरू होते, चिंतनोपश्यनाला चालना मिळते. चिंतनोपश्यना साध्य व्हायला लागली तर 'मौन' हवे-हवेसे वाटायला लागते. त्यात अवरोध झालेला आवडत नाही. आत्मचिंतन आणि आत्म-मूल्यांकनाचा मार्ग सुकर होतो. आपले दोष दिसायला लागतात. आपल्या जमेच्या चित्तवृत्तीची ओळख व्हायला लागते. आपल्या खोल चित्तात दडलेली photo-negative point, positive print होऊन स्पष्ट व्हायला लागते. पुढचा मार्ग दिसायला लागतो. मैत्र-साधनेचा प्रभाव मनावर बिंबतो. चिंतनोपश्यना जागृतावस्थेत, दैनंदिन जीवनातही करता येते असा विश्वास बळावतो. अंतर्मनात उठलेल्या सद्भावना क्रियान्वित करून घेण्याची प्रेरणा व्हायला लागते. चिंतनोपश्यनाच्या स्टेशनपर्यंत न पोहचणाऱ्या शिबिरार्थी मित्रांमध्ये काया-विपश्यना हे एक कर्मकांड होऊन राहिल्याचे मला जाणवते.

**आपल्यातले वृत्ति-दोष आवरणे शिकण्याचा कल व्यवहारात जाणवतो.**

मात्र संवेदनाच्या स्पर्शाने विकसित होणाऱ्या चिंतनोपश्यनेचा शोध बुद्धाने लावला. स्पर्श, दृष्टी आणि श्रवणातून संवेदना चित्ताशी संपर्कात येते. ह्या संवेदना प्रथम ओळखल्या जातात (recongnised), मग स्मृती (memory) सोबत match केल्यावर त्यांचे assimilation आणि analysis (विश्लेषण) होते. स्मृतीत Bias जर खोलवर दडलेले असतील तर मनुष्य reflexly (विचार-विश्लेषण न करता) प्रतिक्रिया (reaction) देतो. चिंतनोपश्यनेत स्पर्श करणाऱ्या संवेदनांच्या जुन्या विरोधीस्मृतीची उपेक्षा करून वर्तमानांत पुनश्च विवेकाने विश्लेषण करूनच मग विपश्यक कृतिपर होतो. (thoughtful action). प्रतिक्रिया तीन प्रकारे प्रकट होऊ शकते - 1) Motor action (बोलणे, लिहिणे, शारीरिक हालचाली), 2) भावनांच्या रूपात Body language द्वारे आणि 3) Projections (Visual-Auditory) - अनुभूतीच्या दर्शनाने.

सारांश विवेकपूर्ण प्रतिक्रिया देण्यास शिकणे म्हणजे चिंतनोपश्यना. ह्यासाठी संवेदनेच्या पाठीशी असणारा हेतू पूर्वाग्रहाची उपेक्षा करून ओळखायचा असतो आणि प्रतिक्रिया विवेकी असावी ह्याचे भान ठेवायचे असते. चित्ताच्या आरोहणाचा (चित्तशुद्धी) मार्ग मग उघडतो. चित्तशुद्धी आचरणात प्रकट व्हायला लागते. प्रत्येक क्षणी जागृतता व संयम (तटस्थ वृत्ती) बाळगून दैनंदिन आचरणात त्यास उतरविणे ही ध्यानसाधनेची दुसरी पायरी.

चित्तशुद्धी योग्य मार्गावर (निसर्गाशी एकरूपता) अग्रेसर होत आहे, ह्याची जाणीव अनुभूतीच्या आधारे होते. मनात निर्माण होणारे समाधान, कृतकृत्यता, मैत्र, आनंद (मुदिता) आणि शांती ह्यांची अनुभूती ही स्वतःमध्ये वास करणाऱ्या निसर्गासोबत (कॉन्शन्स, चेतना)च्या आपल्या एकरूपतेची ग्वाही असते. त्या अनुभूतीच्या स्मृती स्थायी असतात. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात असे प्रसंग येतात मात्र ते क्षणिक असतात. चिंतनोपश्यनेत अश्या सृजनशील आठवणींना उजाळाही देता येतो. मात्र ध्यान-साधनेत अश्या अनुभूतींचे सातत्य साधनेद्वारे शिकायचे असते.

ध्यानाचे प्रयोजन चित्तशुद्धी आहे, हे विसरू नये!

**ईमेल :** ulhasjajoo@gmail.com

# विळा लावणारा जन्म

*वैभव देशमुख*

---

मांडवावर पसरलेली वेल
बुडापासून कापून घ्यावी विळ्यानं
सपकन
तसा
आईवडिलांच्या
मुलगा होण्याच्या प्रार्थनेला
विळा लावणारा तिचा जन्म
तिचा जन्म
तिच्या आईच्या स्तनांना
दुधाऐवजी भय फोडणारा ...

ती जन्मली
अन् तिच्या आईच्या पाठीवर
मागच्या बाळंतपणातले
काळेनिळे वळ
पुन्हा जिवंत झाले

ती जन्मली
अन् कोपऱ्यात निपचित पडलेल्या
हिंस्र दुःखाने
पुन्हा डोळे उघडले ...

(**पूर्वप्रसिद्धी** : *मीडिया वॉच* दिवाळी २०१६ )

**ईमेल** : vaibhav.rain@gmail.com